७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शुक्रवार, दि. ०३ जुलै २०२६

www.dainikesandhya.com  www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १८८ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ३ रूपये

# अनुसूचित जमाती जात पडताळणी प्रक्रिया सुलभ करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेची ५२ वी बैठक



मुंबई (दै. संध्या)

अनुसूचित जमाती जात पडताळणी प्रक्रिया अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अधिक पारदर्शक, सुलभ, विश्वासार्ह आणि लोकाभिमुख करावी. ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करून सर्व जात वैधता प्रमाणपत्रांचे सुरक्षित डिजिटल पडताळणी व्यवस्थेत रूपांतर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. विधानभवन येथे महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ५२ व्या बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी या बैठकीला आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके, अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ आणि विविध लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जात पडताळणीची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन करण्यात यावी. ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे प्रमाणपत्रांची सुरक्षित पडताळणी व्यवस्था विकसित करावी. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रणालीद्वारे दुबार अर्ज, कागदपत्रांची प्राथमिक छाननी आणि पडताळणी अधिक परिणामकारक करावी. आदिवासी, वन व महसूल विभागाने पारधी समाजासाठी संयुक्तरित्या शिबिर राबवून विविध आवश्यक प्रमाणपत्रांचे वितरण करावे. अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी घटक कार्यक्रमासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत वित्त विभागाशी समन्वय साधून कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आदिवासी विकास विभागासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक व कल्याणकारी योजनांमधील उत्पन्न मर्यादेचा पुनर्विचार करून अधिकाधिक आदिवासी विद्यार्थ्यांना योजनांचा लाभ मिळेल यासाठी किमान चार लाख रूपये उत्पन्न मर्यादा करण्याबाबतची कार्यवाही करावी.अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी अधिनियमामधील सुधारणा प्रक्रियेला गती देणे. प्रकल्प अधिकारी, रिक्त पदे, न्यायालयीन प्रकरणांसाठी विशेष विधिज्ञांची नियुक्ती आणि प्रशासकीय कार्यक्षमता वाढविण्याबाबत संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी. आदिवासी विकास विभागामार्फत इतर विभागांना वितरित होणाऱ्या निधीचे प्रभावी नियंत्रण व योजनांचे नियमित मूल्यमापन करण्यासाठी राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय यंत्रणा अधिक सक्षम करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी वनहक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसह वनसंवर्धन आणि आदिवासींच्या आर्थिक उन्नतीसाठी मिशन आधारित उपक्रमांचा आढावा घेतला. धरण क्षेत्रातील मत्स्यव्यवसाय तसेच नव्या योजनांमध्ये स्थानिक आदिवासींना प्राधान्य मिळेल यासाठी विद्यमान धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्याच्या सूचना केल्या. बांबू, तेंदूपत्ता, आपटा यांसारख्या लघुवनोत्पादनांवरील ग्रामसभांच्या अधिकारांबाबत विद्यमान धोरणांचा आढावा घेऊन ग्रामविकास व आदिवासी विकास विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी तंत्रज्ञानाधारित, पारदर्शक आणि परिणामकारक प्रशासन उभारण्यावर भर देत सामान्य प्रशासन विभाग व आदिवासी विकास विभागाने समन्वयाने काम करून प्रलंबित विषयांची वेळेत पूर्तता करावी. आदिवासी विकास विभागातील रिक्त पदे भरणे, तसेच विविध विभागांकडून आदिवासींसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सक्षम नियंत्रण यंत्रणा निर्माण करण्यासाठी सूचना त्यांनी केल्या.

# अशोक खरातवरील सिनेमाचा ट्रेलर येताच, रुपाली चाकणकरांचा संताप

पुणे (दै. संध्या)



अशोक खरात प्रकरणात माझ्यावर आणि कुटुंबियांवर वाट्टेल तसे आरोप करण्यात आले आहेत. माझ्या कुटुंबियांना टार्गेट करण्यात आल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर यांनी व्यक्त केले. माझी मुलं शैक्षणिक क्षेत्रात असूनही त्यांच्यावरही वाट्टेल तसे आरोप करण्यात आले आहेत. मी आशा मिरगे यांना केलेल्या आरोपानंतर त्यांना नोटीसा पाठवल्या होत्या, मात्र त्यांनी त्या स्वीकारल्या नाहीत असे चाकणकर म्हणाल्या. दरम्यान, अशोक खरातवर 'महाराष्ट्र एपस्टीन फाइल्स' चित्रपट येणार आहे. यावर देखील चाकणकर यांनी भाष्य केलं. दिल्ली हायकोर्टातही मी याचिका दाखल केलेली आहे. त्यात रुपाली ठोंबरे, सुषमा अंधारे, अंजली दमानिया आणि आशा मिरगे यांना नोटिसा गेलेल्या आहेत असे रुपाली चाकणकर म्हणाल्या. 10 जुलैला दिल्ली हायकोर्टात मी स्वतः हजर राहणार असल्याची माहिती रुपाली चाकणकर यांनी दिली. काही यूट्यूब चॅनेल्स आहेत त्यांच्याविरोधातही आम्ही कोर्टात जात आहोत असे चाकणकर म्हणाल्या. जो कथित सिनेमा येतो आहे, ते प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. एखादे पात्र साकारताना संबंधित पात्राची परवानगी घेणे आवश्यक असते, माझी कुठलीही परवानगी घेण्यात आलेली नाही. त्यांच्या विरोधातही मी कायदेशीर कारवाईचे पाऊल उचलणार असल्याची माहिती रुपाली चाकणकर यांनी दिली.

नाशिकमधील भोंदू अशोक खरात प्रकरणाने काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रात मोठी खळबळ उडाली होती. अंधश्रद्धेच्या जाळ्यात ओढत महिलांवर अत्याचार करणाऱ्या भोंदू अशोक खरातवर 'महाराष्ट्र एपस्टीन फाइल्स' चित्रपट येणार आहे. या चित्रपटाची गेल्या काही दिवसांपासून प्रचंड चर्चा सुरू आहे. या चित्रपटाचा नुकताच टीझर रिलीज झाला.

# अश्विनी भिडे यांनाच जबाबदार धरले जाणे कितपत योग्य आहे?

मुंबई (दै. संध्या)



उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे विधानपरिषदेतील आमदार मिलिंद नार्वेकर यांनी एक्सवर एक सोशल मीडिया पोस्ट केली आहे. मुंबईतील साकीनाका येथे मॅनहोलमध्ये पडून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याच्या घटनेबाबतची मिलिंद नार्वेकर यांची ती पोस्ट आहे. मॅनहोल दुर्घटना संतापजनक असून दोषी असलेल्या स्थानिक अधिकाऱ्यांवर कडक कारवाई झालीच पाहिजे. या दुर्घटनेसाठी मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांना जबाबदार धरलं जाणं कितपत योग्य आहे, असा सवाल मिलिंद नार्वेकर यांनी केला आहे. मॅनहोल दुर्घटना ही नक्कीच संतापजनक असून दोषी स्थानिक अधिकाऱ्यांवर कडक कारवाई झालीच पाहिजे. परंतु, या दुर्घटनेसाठी पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनाच जबाबदार धरले जाणे कितपत योग्य आहे? स्थानिक स्तरावरील हलगर्जीपणा आधी तपासला गेला पाहिजे, असे माझे स्पष्ट मत आहे, अशी पोस्ट आमदार मिलिंद नार्वेकर यांनी केली आहे. विशेष बाब म्हणजे नार्वेकर यांनी त्यांच्या पोस्टमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना टॅग केलं आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते आणि उपमहापौर संजय घाडी यांनी मॅनहोल दुर्घटनेला महापालिका आयुक्त जबाबदार असल्याचं म्हटलं होतं. मी स्वत: उपमहापौर आणि मुंबईचा नागरिक या नात्यानं आयुक्तांना पत्र दिलं होतं. आपण या सर्व मॅनहोलची तपासणी करायला अधिकाऱ्यांना सांगावं, जिथं संरक्षित जाळ्या नसतील तिथं संरक्षित जाळ्या आपल्याला लावायला पाहिजेत, अशी लेखी मागणी केली होती.

आयुक्तांनी त्याचं गांभीर्य लक्षात घेतलं नाही, त्यांनी तातडीनं काम करायला पाहिजे होतं, याला आयुक्त देखील जबाबदार आहेत, असं उपमहापौर संजय घाडी यांनी बोलताना म्हटलं होतं. या घटनेसंदर्भात प्रशासनाला जाब विचारला जाईल असं घाडी यांनी म्हटलं.

# पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहावे : गिरीश महाजन

### अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडणे टाळावे : आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांची राज्य आपत्कालीन नियंत्रण कक्षाला भेट

मुंबई (दै. संध्या)



राज्यात दमदार पावसाला सुरुवात झाली असून गेल्या दोन दिवसांपासून अनेक भागांत पाऊस सुरू आहे. विशेषतः मुंबईत चांगला पाऊस होत असून राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर वाढला असून अनेक ठिकाणी नद्या, नाले भरून वाहत आहेत. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात संभाव्य आपत्ती परिस्थितीचा सामना करण्यासाठी राज्यातील आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि सर्व जिल्ह्यांतील आपत्कालीन यंत्रणा पूर्णपणे सतर्क ठेवण्यात आल्या आहेत. आपत्ती नियंत्रण कक्ष 24 तास कार्यान्वित करण्यात आले आहेत, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन व जलसंपदा ( विदर्भ, तापी, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. मंत्री महाजन यांनी मंत्रालयातील राज्य आपत्कालीन नियंत्रण कक्षाला भेट देऊन पाहणी केली आणि अधिकारी आणि कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. यावेळी त्यांनी शासकीय यंत्रणेस सतर्कतेच्या सूचना दिल्या. याप्रसंगी विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंगल, संचालक डॉ भालचंद्र चव्हाण उपस्थित होते.

मंत्री महाजन म्हणाले की, भारतीय हवामान विभागाने ३ आणि ५ जुलै रोजी राज्यातील काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडणे टाळावे तसेच प्रशासनाने जारी केलेल्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

ते म्हणाले, राज्य शासन आणि प्रशासन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. मात्र प्रत्येक नागरिकानेही स्वतःची आणि आपल्या कुटुंबाची सुरक्षितता लक्षात घेऊन आवश्यक ती खबरदारी घेणे तितकेच महत्त्वाचे आहे.

मुंबईतील काही भागांत पावसामुळे पाणी साचण्याच्या घटना घडल्या होत्या. मात्र संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना केल्यामुळे सध्या परिस्थिती नियंत्रणात असून बहुतांश ठिकाणी जनजीवन सुरळीत झाले आहे, असेही त्यांनी सांगितले. मंत्री महाजन यांनी सांगितले की, मुंबई महापालिका तसेच संबंधित सर्व यंत्रणांच्या सातत्याने संपर्कात राहून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी यासाठी महानगरपालिका प्रशासनाला आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यातील सर्व नागरिकांनी सतर्क राहावे, सुरक्षित राहावे आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांना सहकार्य करावे, असे आवाहन मंत्री गिरीश महाजन यांनी केले.

नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत संपर्कासाठी राज्य आपत्कालीन नियंत्रण कक्षाचे 24×7 हेल्पलाइन क्रमांक : 1070, 09321587143, 022-22027990, 022-22794229 असून जिल्हास्तरीय संपर्क क्रमांक: 1077 आहे.

या भेटीदरम्यान, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल यांनी सद्यस्थिती, तयारीची सद्यस्थिती आणि विभागामार्फत हाती घेण्यात आलेल्या प्रमुख उपाययोजनांची माहिती दिली.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

e-paper www.sandhyaepaper.com

ढिंग-टांग




### डेटा डिलीट केल्याचा आणि हत्येच्या कटात तिसऱ्या व्यक्तीचाही सहभाग असल्याचा संशय

# केतनला ढकलण्यापूर्वीच फोन सियाच्या हातात कसा?

मुंबई (दै. संध्या)



> चेतन चौधरीचे वकील ऋषिकेश उत्तरवार यांनी म्हटले आहे की, "हे सर्व सध्या केवळ आरोप आहेत. ते सिद्ध करण्यासाठी पोलिसांना न्यायालयात ठोस पुरावे सादर करावे लागतील. बचाव पक्ष म्हणून आम्ही पोलिसांच्या पुराव्यांमधील त्रुटींची तपासणी करू." आता सिया आणि चेतनच्या उरलेल्या पोलीस कोठडीत, या हत्येमागे आणखी कोणता 'मास्टरमाइंड' किंवा मदतनीस आहे का, हे शोधण्याचे मोठे आव्हान लोणावळा पोलिसांसमोर आहे.

व्यावसायिक केतन अग्रवाल हत्या प्रकरणात दररोज नवनवीन आणि धक्कादायक खुलासे होत आहेत. 18 जून रोजी लोहगड किल्ल्यावरून ढकलून केतनची हत्या करण्यात आली. याप्रकरणी त्याची होणारी पत्नी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी यांना अटक करण्यात आली असून, ते 3 जुलैपर्यंत पोलीस कोठडीत आहेत. आता या प्रकरणात डिजिटल पुराव्यांच्या अनुषंगाने आणि तिसऱ्या व्यक्तीच्या सहभागाच्या शक्यतेने तपासाला नवे वळण मिळाले आहे. पोलिस तपासात आणि न्यायालयात मांडलेल्या घटनाक्रमातून आणखी काही मुद्दे समोर आले आहेत.

लोहगडावर केतनला 350 फूट खोल दरीत ढकलण्यात आले, मात्र त्याचा मोबाईल फोन सियाकडे सुरक्षित कसा राहिला, हा पोलिसांच्या तपासातील सर्वात मोठा प्रश्न आहे.

डेटा डिलीट केल्याचा संशय: केतनचे कुटुंबीय लोहगडावर पोहोचण्यापूर्वी काही काळ हा फोन सियाकडेच होता. नंतर तिने तो कुटुंबीयांकडे दिला. मात्र, हत्येचा कट उघड होऊ नये म्हणून या मधल्या वेळात सियाने केतनच्या फोनमधील महत्त्वाचे चॅट्स, कॉल रेकॉर्ड्स आणि इतर डेटा डिलीट केल्याचा दाट संशय पोलिसांना आहे. हा फोन आता फॉरेन्सिक लॅबकडे पाठवण्यात आला असून, डिलीट झालेला डेटा रिकव्हर झाल्यानंतर हत्येचे महत्त्वाचे धागेदोरे उलगडण्याची शक्यता आहे.

लोणावळा पोलिसांनी लोहगडावर आरोपी चेतन चौधरीला नेऊन 'क्राइम सीन री-क्रिएशन' (गुन्ह्याची पुनर्रचना) केले. यावेळी चेतनने हुडी घातलेली होती आणि त्याने डमी पुतळा दरीत ढकलून घटनाक्रम पोलिसांना सांगितला.

हत्येसाठी सिया आणि चेतनने आधीच एक 'सिग्नल' ठरवला होता. निर्जन ठिकाणी पोहोचताच सिया जमिनीवर बसली (हाच तो सिग्नल होता), आणि दबा धरून बसलेल्या चेतनने वेगाने येऊन केतनला दरीत ढकलले, अशीही शक्यता आहे.

हा खून पूर्वनियोजित होता, हे चेतनच्या आणखी एका कृतीतून स्पष्ट होते. मोबाईल लोकेशनवरून आपण ट्रॅक होऊ नये, यासाठी हत्येच्या दिवशी चेतनने स्वतःचा फोन घरीच ठेवला होता आणि दुकानातील एका कर्मचाऱ्याचा फोन तो सोबत घेऊन गेला होता.


सर्वात मोठी बाब म्हणजे, या हत्येच्या कटात सिया आणि चेतनव्यतिरिक्त आणखी कोणाचा तरी सहभाग आहे का? असा संशय पोलिसांना आहे.

न्यायालयात कोठडी वाढवून मागताना पोलिसांनी या अँगलने तपास करायचा असल्याचे स्पष्ट केले आहे. पोलिसांनी आतापर्यंत सियाचा भाऊ साहिल, तिचे आई-वडील, लग्न ठरवणारे मध्यस्थ (मित्तल दाम्पत्य) आणि कॅब ड्रायव्हर यांचे जबाब नोंदवले आहेत.

केतनशी सियाला लग्न करायचे नव्हते, हे तिचा भाऊ साहिलला आधीच माहीत होते. मग फूड मॉलवर जेव्हा केतनचा पासपोर्ट गायब झाला (जो सियाने फाडला होता), तेव्हा साहिलला संशय का आला नाही? की त्याने तो संशय जाणीवपूर्वक लपवला? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

# वाशिम न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल!

### कोठडीतील मृत्यू प्रकरणी ९ पोलिसांना जन्मठेपेची शिक्षा; १५ वर्षांनंतर पारधी कुटुंबाला न्याय



**सर्वसामान्यांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास दृढ झाला**

> या प्रकरणात पीडित कुटुंबाची बाजू मांडणारे सरकारी वकील श्रीराम काळू यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, "हा निकाल अत्यंत ऐतिहासिक आणि कायद्याचे राज्य असल्याचे सिद्ध करणारा आहे. गुन्हेगार कितीही प्रभावशाली पदावर किंवा पोलिस दलात असला, तरी कायदा सर्वांसाठी समान आहे. सर्वसामान्यांनाही न्यायालयात न्याय मिळतो, ही भावना या निकालामुळे समाजात अधिक दृढ झाली आहे."

वाशिम (दै. संध्या)

वाशिम जिल्हा सत्र न्यायालयाने एका अत्यंत गंभीर आणि संवेदनशील प्रकरणात ऐतिहासिक निकाल दिला आहे. सन २०११ मध्ये पोलिस कोठडीत असताना झालेल्या अमानुष मारहाणीत एका संशयित तरुणाचा मृत्यू झाला होता. या 'कस्टोडियल डेथ' प्रकरणाची गंभीर दखल घेत न्यायालयाने तत्कालीन ठाणेदारासह तब्बल नऊ पोलिस कर्मचाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. जिल्हा सत्र न्यायाधीश जयसिंग झपाटे यांनी हा निकाल दिला असून, या निर्णयामुळे महाराष्ट्र पोलिस दलात मोठी खळबळ उडाली आहे.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, हे प्रकरण ९ मे २०११ रोजी घडले होते. रिसोड पोलिस ठाण्याचे तत्कालीन प्रभारी अधिकारी (ठाणेदार) महादेव माणिक धांडे आणि त्यांच्या इतर ८ कर्मचाऱ्यांनी हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यात असलेल्या वाढोणा येथील पारधी वस्तीवर छापा टाकला होता. एका चोरीच्या गुन्ह्यात संशयित म्हणून पोलिसांनी बेग्या पवार या तरुणाला ताब्यात घेतले होते. चोरीचा गुन्हा कबूल करण्यासाठी पोलिसांनी बेग्याला पोलिस कोठडीत बेदम मारहाण केली. या अमानुष मारहाणीमुळे दुसऱ्याच दिवशी म्हणजेच १० मे २०११ रोजी बेग्या पवारचा कोठडीतच मृत्यू झाला.

या मृत्यूमुळे निर्माण झालेला तणाव पाहता, शासनाने या प्रकरणाचा तपास गुन्हे अन्वेषण विभागाकडे (CID) सोपवला होता. सीआयडीच्या पथकाने ३४ दिवस सखोल तपास करून दोषी पोलिसांवर खुनाच्या गुन्ह्यासह विशेष अ‍ॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. अखेर तब्बल १५ वर्षे, १ महिना आणि २३ दिवसांच्या प्रदीर्घ कायदेशीर लढ्यानंतर पीडित कुटुंबाला खऱ्या अर्थाने न्याय मिळाला आहे.

**दोषी ठरलेले 'ते' ९ पोलिस**

**अधिकारी आणि कर्मचारी**

न्यायालयाने सबळ पुराव्यांच्या आधारे खालील नऊ जणांना दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली:

महादेव माणिक धांडे (तत्कालीन ठाणेदार)
मदन केशव पवार (पोलिस कर्मचारी)
शिवाजी नामदेव खिल्लारी (पोलिस कर्मचारी)
पंजाब माणिकराव पाटकर (पोलिस कर्मचारी)
रमेश सीताराम पवार (पोलिस कर्मचारी)
प्रकाश हिरालाल तारम (पोलिस कर्मचारी)
नागोराव भगवान खांडके (पोलिस कर्मचारी)
अशोक निवृत्ती वैद्य (पोलिस कर्मचारी)
वसंत कणिराम जाधव (पोलिस कर्मचारी)

मृत बेग्या पवार याच्या आईने निकालानंतर भावूक होत प्रतिक्रिया दिली. "माझ्या मुलावर यापूर्वी कोणताही गुन्हेगारी रेकॉर्ड नव्हता किंवा त्याने साधा कोणताही गुन्हा केला नव्हता.

## संपादकीय

# मेहनतीशिवाय यश नाही

विद्यार्थ्यांचे यश केवळ परीक्षेतील गुणांवर अवलंबून नसून आत्मविश्वास, नियमित अभ्यास, योग्य नियोजन आणि सकारात्मक दृष्टिकोन यावरही तेवढेच अवलंबून असते. नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासूनच सातत्यपूर्ण मेहनत, पालक-शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि शिस्तबद्ध दिनचर्या अंगीकारल्यास प्रत्येक विद्यार्थी यशाचे शिखर गाठू शकतो. उन्हाळी सुट्टीनंतर शाळा सुरू होऊन आजचा तेरावा दिवस आहे. विद्यार्थी यशस्वी होण्यासाठी त्यांच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होणे आवश्यक आहे. तरच तो विद्यार्थी जीवनात यशस्वी होऊ शकतो. त्यासाठी त्यांच्या मनात स्वत:चा आत्मविश्वास निर्माण झाला पाहिजे. तो आत्मविश्वास पालक आणि शिक्षकवर्गाने निर्माण करायला हवा. विद्यार्थ्यांच्या जीवनात पालक आणि शिक्षक अधिक जवळचे असतात. त्यामुळे त्यांची आवडनिवड व सवय त्यांना माहीत असते. बरेच विद्यार्थी परीक्षेपर्यंत बेसावध असतात. परीक्षा जवळ आली की, रात्रीचा दिवस करून अभ्यासाला लागतात. याचा परिणाम विद्यार्थ्यांचे मन विचलित होते. पुढे काय करावे त्यांनाच समजत नाही. त्यांच्या मनावरील दडपण वाढते. याचा परिणाम त्याला कमी गुण किंवा त्या परीक्षेत अपशय येऊ शकते. यासाठी मुलांनी विद्यार्थी म्हणून यशस्वी होण्यासाठी कठोर परिश्रम घेतले पाहिजेत. तसेच अभ्यासामध्ये नियमित सातत्य ठेवावे लागेल. कठोर परिश्रम आणि अभ्यासात सातत्य ठेवण्यासाठी अभ्यासक्रमाचे योग्य नियोजन करावे लागेल. त्यांनी या तीन गोष्टी पाळल्या, तर परीक्षेत उत्तम गुण मिळू शकतात. आपण सहज परीक्षेत यश संपादन करू शकतो असे जरी विद्यार्थ्यांना वाटत असले तरी तितके ते सोपे नसते. मुळात त्याला शिकण्याची आवड पाहिजे. म्हणजे तो पुढे काहीतरी करू शकतो. खरे म्हणजे नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाल्यावर पहिल्या सुरुवातीपासून विद्यार्थ्यांनी अभ्यासाला लागावे. शाळेमध्ये ज्या धड्याचे अध्ययन झालेले असेल त्याची घरी आल्यावर उजळणी करावी. त्या आधी पूर्ण धडा वाचावा म्हणजे आपण त्या धड्यात काय शिकणार आहोत याची कल्पना येते. त्यासाठी प्रथम विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन करावे लागेल. त्याप्रमाणे रोज अभ्यास करावा म्हणजे अभ्यास करण्याची सवय लागते. तसेच विद्यार्थ्यांनी विषयांचे वेळापत्रक तयार करून अभ्यास करावा. यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात ताणतणाव वाढत नाही. परीक्षेच्या वेळी अधिक उत्साहाने जातात. आपण एक विद्यार्थी आहोत याची जाणीव त्यांना असायला हवी. शाळेची वेळ, घरातील इतर कामे आणि मोकळा वेळ गृहीत धरून विद्यार्थ्यांना वेळेचे नियोजन करावे लागेल. म्हणजे विषयांचे वेळापत्रक तयार करून दर दिवशी दिलेल्या वेळेनुसार अभ्यास करावा लागेल. या पद्धतीमुळे अभ्यासात सातत्य राहील. अभ्यास नियमितपणे केला जाईल. असे जरी असले तरी अवांतर वाचनसुद्धा अतिशय महत्त्वाचे असते. शाळेमध्ये शिक्षक अध्यापन करीत असताना लक्षपूर्वक ऐकावे. त्यातल्या काही आवश्यक मुद्द्यांचे टिपण करावे. काही शंका असल्यास बिनधास्तपणे अध्यापकांना विचाराव्यात. चुकीचे समजून घेऊ नये. यात आपलेच नुकसान आहे. म्हणजे अध्यापक वर्गात अध्ययन करीत असताना विद्यार्थ्यांनी लक्ष केंद्रित करावे. बऱ्याच वेळा धड्याखाली जे प्रश्न विचारलेले असतात तेच प्रश्न परीक्षेच्या वेळी विचारले जातात. तेव्हा त्या प्रश्नांची जी अचूक उत्तरे असतील त्याची नियमित उजळणी करणे गरजेचे असते.

तसेच जे प्रश्न दिलेले असतील त्या उत्तरांची सुद्धा उजळणी व्हायला हवी. दुर्लक्ष केल्यास परीक्षेच्या वेळी जर तो प्रश्न विचारला गेल्यास अचूक उत्तर आपण लिहू शकत नाही. तेव्हा विषयाचे अध्ययन जरी झाले तरी प्रश्नांच्या उत्तरांची वेळच्यावेळी उजळणी करावी लागेल. म्हणजे परीक्षेला उत्तरे लिहिताना अडथळा येणार नाही. अधिक आत्मविश्वासाने परीक्षेची उत्तरपत्रिका सोडवू शकतो. हे सर्व नियमित अभ्यास आणि उजळणी केल्यामुळेच शक्य होऊ शकते. विशेष म्हणजे प्रत्येक दिवशी सर्व विषयांची उजळणी करणे शक्य नसते. अशावेळी आपल्याला जो धडा कठीण वाटत असेल त्याचीच उजळणी करावी.

## संस्कृत सुभाषित

मन:शुद्ध्यैव शुद्धि: स्याद् देहिनां नात्र संशय:।
वृथा तद्व्यतिरेकेण कायस्यैव कदर्थनम्॥

अर्थ : मनाची शुद्धी हीच माणसाची खरीखुरी शुद्धी असते, यात काही शंका नाही. मन शुद्ध नसेल तर बाह्य शरीराच्या शुद्धीचा प्रयत्न म्हणजे शरीर व्यर्थ राबविणेच होय.

## गुरु वचन

### त्यागाने योग प्राप्ती

संसारामध्ये कोणताही व्यापारी व्यापारासाठी जेवढी गुंतवणूक करतो. तेवढ्याच अधिक फायद्याचा भागीदार तो बनतो. अशाप्रकारे लक्ष, कोटी, अब्ज असा जेवढा अधिक खर्च केला जातो. तेवढाच त्याचा अधिक लाभ मिळतो. शेतकरी शेतामध्ये काही धान्य पेरतो तेव्हाच त्यापासून अधिक धान्य मिळते. यज्ञकार यज्ञामध्ये आहुती देतो, तेव्हाच त्याला लोक-परलोकामध्ये विविध ऐश्वर्य आणि सुख प्राप्त होते. अशाप्रकारे भोगत्यागनेच उत्तम भोगाची प्राप्ती होऊ शकते. मानवास वाटते की, वसन, अलंकार, उत्तम भोजन, उत्तम वनिता, पूत्र तसेच सर्वाधिक ऐश्वर्य असावे, परंतु असे वाटण्याने हे सर्व होणे अशक्य आहे. हे सत्य आहे की, लाख प्रयत्न केल्यानंतर सुद्धा मनुष्याला शरीरात घालायला कपडे आणि पोट भरण्यास अन्न मिळत नाही. यासाठी कठोर परिश्रमाशिवाय प्रावक्त धर्माधर्मही अतिरिक्त वस्तुंच्या प्राप्तीसाठी कारण ठरतात. अन्यायानंतर प्राप्त झालेल्या धनासोबतही त्याला वैर वाटते.किंवा त्याचा विनाश होऊन जातो. किंवा योग करणाऱ्याची भोगशक्ती खत्म होऊन जाते. शेवटी त्याग आणि ग्रहण दोन्हीही शास्त्रानुसार अनुकूल वैराग्य आणि त्याग असल्याने सवर्गलोक, इंद्रलोक, वृहलोक प्राप्त होते. येथील भोगाप्रमाणे इतरत्र योग प्राप्त होने असंभव आहे. जो रस, जो शब्द, जो सुगंध तेथे आहे जी उर्वशी, राची, रंभा आदी लोकांमध्ये प्राप्त होते, ते येथे कोठे. श्वान, शकर, शृंगाल आदी योग विषयांत स्पृहाचाही काय अर्थ असू शकतो? बुद्धीमान लोक तर त्या सुखामध्ये अनित्यता आणि विनश्वरताचा अनुभव घेऊन वेगळे होतात.

## उपदेशकथा

### लगाम हाती हवा

इराणचा क्रूरकर्मा बादशहा नादिरशहाने 'बुद्धीचे बळ नि मनगटाची मस्ती' यांच्या जोरावर दिल्लीपर्यंत धडक मारून साम्राज्य विस्तार केला. त्यावेळी दिल्लीच्या तख्तावर मोहम्मदशाहा रंगीले हे होते. या दिल्लीपतीने विजयी नादिरशहाला हत्तीच्या अंबारीत बसवून शहराची सैर घडवण्याचा हुकूम दिला. शाही पीलखान्यातील ऐरावतासारखा उमदा हत्ती हजर झाला. सोन्याची अंबारी, भरजरी झूल, त्याला रुप्याच्या झालरी नि झिरमिल्या, मोत्यांच्या माळा, इराणच्या शहाला हत्ती हे वाहन अपरिचित होते. अंबारीत स्थानापन्न होतो तो त्याला अंबारीपुढे एक शाही हुजऱ्यासारखा दिसणारा इसम बसलेला दिसला. तो बिचारा माहूत होता. 'कोण रे बाबा तू? तुझं काय काम? लगाम माझ्या हाती सोपव नि आपला रस्ता सुधार.' नादिरशहानं फर्माविले. माहूत चमकला. थोडा वेळ थांबला. अखेर धैर्य एकवटून त्याने म्हटले, 'खाविंद, कसूर माफ असावी. हत्तीला लगाम नसतो. माहूतच हातच्या अंकुशानं जनावरावर नियंत्रण ठेवतो.' नादिरला नवल वाटलं. 'आश्चर्य आहे. या अजस्त्र प्राण्याला लगाम नसतो? तर मग मी उतरतो. ज्या वाहनाचा लगाम माझ्या हाती नाही त्यावर मी बसणार नाही. स्वत:ची बहुमोल जिवन दुसऱ्याच्या हाती सोपवणारा हा नादिरशहा नव्हे.' माहुताने इशारत करताच हत्ती झुकला. पुढचे गुडघे टेकले. शाही स्वारी पायउतार झाली.

कथा उपदेश : जीवनाची वेसणदोरी त्याने सदोदित स्वत:च्या हाती ठेवली यातच कदाचित त्याच्या यशाची गुरूकिल्ली असेल.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:विष्कुम्भ १६:५९:१२ |
| ३ जुलै २०२६ | करण:विष्टि ११:२०:३८ |
| शुक्रवार | करण:बव २४:०३:४०+ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:मिथुन |
| निज ज्येष्ठशके | चन्द्र:मकर |
| संवत्– १९४८ | हिजरी सन् – १४४८ |
| संवत्सर –पराभवनाम | मुस्लिम मास – मोहरम |
| अयन– दक्षिणयन | तारीख – १७ |
| मास– निज ज्येष्ठ | विशेष |
| ऋतु– सौर वर्षा | संकष्ट चतुर्थी |
| कृष्ण पक्ष | चंद्रोदय ९.४९ |
| तिथि:तृतीया ११:२०:३८ | मुंबई २१.४९ |
| नक्षत्र:श्रवण ११:४६:२४ | अकोला २१.३६ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९९९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | | | 6 | 3 | 8 | | | 1 |
| | | 8 | | | | 9 | 6 | |
| 7 | 4 | 6 | | | 5 | | | |
| | 1 | | 5 | | | 8 | 2 | |
| 5 | | 7 | | | | 6 | | 3 |
| | 8 | 9 | | | 1 | | 5 | |
| | | | 4 | | | 2 | 9 | 7 |
| | 7 | 3 | | | | 1 | | |
| 4 | | | 2 | 6 | 7 | | | 8 |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९९८ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 8 | 3 | 1 | 5 | 9 | 7 | 4 | 6 |
| 7 | 5 | 4 | 8 | 6 | 3 | 9 | 2 | 1 |
| 1 | 6 | 9 | 7 | 2 | 4 | 3 | 5 | 8 |
| 4 | 2 | 5 | 3 | 9 | 6 | 8 | 1 | 7 |
| 9 | 3 | 7 | 5 | 1 | 8 | 4 | 6 | 2 |
| 8 | 1 | 6 | 4 | 7 | 2 | 5 | 3 | 9 |
| 3 | 9 | 8 | 2 | 4 | 1 | 6 | 7 | 5 |
| 5 | 4 | 1 | 6 | 8 | 7 | 2 | 9 | 3 |
| 6 | 7 | 2 | 9 | 3 | 5 | 1 | 8 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ०३२४ – एड्रियानोपलची लढाई.
- ०५३३ – ऍड डेसिममची लढाई.
- ०९८७ – ह्यु कार्पे फ्रांसच्या राजेपदी.
- १२५० – सातवी क्रुसेड – मामलुकसैन्याने फ्रांसचा राजा लुई नवव्याला पकडले.
- १६०८ – कॅनडात क्वेबेक सिटी शहराची स्थापना.
- १७५४ – जॉर्ज वॉशिंग्टनने फोर्ट नेसेसिटी हा किल्ला फ्रेंच सैन्याला दिला.
- १७६७ – रॉबर्ट पिटकैर्नने पिटकैर्न द्वीपसमूह शोधला.
- १७७८ – अमेरिकन क्रांती – ब्रिटीश सैन्याने वायोमिंग मध्ये ३६० स्त्री, पुरूष व बालकांची कत्तल केली.

### राष्ट्रीय

- १३५० – संत नामदेव पंढरपूर येथे समाधिस्थ झाले.
- १८५२ – महात्मा फुले यांनी अस्पृश्यांसाठी पहिली शाळा सुरू केली.
- २००६ – ३५ वर्षांनंतर भारताने वेस्ट इंडीजमध्ये कसोटी मालिका जिंकली.
- २००६ – महसूल विभागाच्या गुप्तचर विभागाने दिल्लीच्या सीमेवर दोन व्यक्तिंना अटक करून त्यांच्याकडून ३५ कोटी रूपयांचे हेरॉईन जप्त केले.

### जन्म

- १४२३ – लुई अकरावा, फ्रांसचा राजाचा जन्म.
- १४४२ – गो–त्सुचिमिकाडो, जपानी स्राट चाजन्म.
- १६८३ – एडवर्ड यंग, इंग्लिश कवीचा जन्म.
- १७१७ – जोसेफ लॅसोन, फ्रेंच रसायनशास्त्रज्ञचा जन्म.

### निधन

- ०६८३ – संत लिओ दुसरा यांचे निधन.
- १९१८ – महमद पाचवा, ओट्टोमन स्राट यांचे निधन.
- १९३३ – हिपोलितो ग्रिगोयेन, आर्जेन्टीनाचा राष्ट्राध्यक्ष यांचे निधन.

## : SMS :

Larki Mandir Main: Hai Bhagwan! Kisi Samajhdar Aadmi Se Meri Shadi Karwa Do. Bhagwan: Ghar Chali Ja Beti! Samajhdar Aadmi Kabhi Shadi He Nahi Karty.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २९.५ | २४.४ |
| अहमदनगर | २९.३ | २३.२ |
| अकोला | ३७ | २४.८ |
| अमरावती | ३६.२ | २५.१ |
| बीड | ३६.६ | २५.७ |
| भंडारा | ३४.५ | २५.९ |
| बुलढाणा | ३९ | ३१.९ |
| चंद्रपूर | ३६.३ | २६.४ |
| चेन्नई | ३९.८ | ३२ |
| नवी दिल्ली | ४१.६ | ३६.२ |
| धुळे | ३८.६ | २७ |
| गोंदिया | ३६.९ | २७.२ |
| जळगाव | ३८.४ | २४.७ |
| कोल्हापूर | २५.२ | २२ |
| लातूर | ३१.५ | २३.९ |
| मुंबई | ३४.५ | २७.७ |
| नागपूर | ३७.६ | २५.३ |
| नांदेड | ३५.२ | २५.६ |
| नंदूरबार | ३३.८ | २६.४ |
| नाशिक | २६.६ | २३ |
| पुणे | २४ | २२.४ |
| पंढरपूर | ३१.४ | २४.१ |
| सातारा | २५.७ | २०.९ |
| सांगली | २६.२ | २२.७ |
| सोलापूर | ३२.२ | २४.७ |
| वर्धा | ३७.८ | २५.२ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : पूर्व राजकीय कामे हातावेगळी होतील. उपयुक्त सल्ला मिळेल.

**तुळ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण शांत व विवेक बुद्धीने काम केल्यास यश मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**वृषभ :** शुभ रंग:पांढरा,शुभ दिशा: पूर्व वाद विवाद किंवा भांडणामुळे आपले मानसिक संतुलन बिघडेल. व्यापार मध्यम राहील.

**वृश्चिक :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:उत्तर कार्याचा विस्तार वाढून अनुकूल परिस्थिती निर्माण होईल. काही महत्वपूर्ण निर्णय घ्याल.

**मिथुन :** शुभ रंग–केसरी, शुभ दिशा:पूर्व मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल.

**धनु :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:दक्षिण कुटुंबात मोठ्यांचे मार्गदर्शन मिळेल. कायद्यातील वादाचा निपटारा होईल. आर्थिक योग उत्तम आहेत.

**कर्क :** शुभ रंग,पांढरा, शुभ दिशा:पूर्व न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत.

**मकर :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर व्यवसायात फायदा होईल त्यामुळे मन प्रसन्न राहील. चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील.


**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील.

**कुंभ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर सामाजिक मान सन्मान मिळाल्याने आनंदी राहील. व्यापारात नवीन संबंध फायदेशीर ठरतील.

**कन्या :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: उत्तर प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल.

**मीन :** शुभ रंग : पिवळा,शुभ दिशा:उत्तर कौटुंबिक किंवा मालमत्ते विषयाच्या समस्या दूर होतील. पराक्रमामुळे विरोधक त्रस्त होतील. कर्ज घेण्यापासून दूर रहा.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९९९



### आडवे शब्द

१. शाब्दिक हजामत
५. बोकड
७. वर्षा ऋतू
१०. व्यवस्थित
११. खंदक
१२. कल्याणकारी सल्ला
१३. तालासुराचे एकत्र येणे
१४. राघूची जोडीदार
१५. समोरासमोरची चकमक
१६. खानेसुमारी
१८. कापड कापण्याचे साधन
१९. जमीन, पृथ्वी
२०. लोकनाट्यातील कलाकार,
२३. विशेष
२५. खर्चाच्या विरुद्ध
२७. बोबडी वळणे
२९. न आवडणाऱ्या व्यक्तीतील चांगले गुणही वाईट भासतात (ला.)
३३. पृथ्वी
३५. शरीर
३६. मराठी भाषते या दोन अक्षरांपासून सुरू होणारा एकही शब्द नाही
३८. कालावधी
३९. नादी लागणे
४१. उद्याच्या नंतरचा दिवस
४३. मृत्यू नसलेला
४५. क्रिकेटमधील धाव
४६. शेवटचे दोन पांडव
४९. पुष्परस
५०. जनन
५१. ढीग
५३. पावाबरोबरचा खाद्यपदार्थ
५४. माराची उमटलेली खूण
५५. जयपराजय
५७. रात्री चमचमणारा कीटक
५८. सणांचा मराठी महिना
५९. केस कापणे
६१. सीतेचा एक पुत्र
६५. घाबरणे
६७. मोठी टोपली
६९. शर्करा
७१. बांबू
७३. हार, सर
७४. राष्ट्रगीताची सुरूवात
७६. ठाणवाई
७८. बाळाचा पाण्याचा शब्द
७९. रसाळ, तजेलदार
८२. एकरूप, रममाण
८३. कामदेव
८४. कसोटी

### उभे शब्द

१. श्रीमंत, धनवान
२. नारळाचे झाड
३. मांडणी
४. पोटाचा असल्यास चिंतेचे कारण!
५. पुष्कळ
६. सततचे नामस्मरण
७. बंधन
८. माल
९. सामन्यातील पराक्रमी खेळाडू
१२. बर्फ
१३. आंदोत्सवाचा दिवस
१४. दोस्ती
१६. अटीची भाषा
१७. अदृश्य
१८. कूर्म
२१. आत्या
२२. गाणे
२३. भोजनालय
२४. आघाडी, एकजूट
२५. वतनदार
२६. कच्चे मडके?
२८. वाढलेला व्याप, अस्ताव्यस्त सामान
३०. नगाऱ्याचा आवाज
३१. चैतन्य, प्रोत्साहन
३२. थंड झाल्यावर पदार्थाचे आकसणे, आकुंचन पावणे
३४. नवरामुलगा
३७. लहान चणीचा
४०. सिंह
४१. दुर्दशा
४२. खास कोकणी द्विदल धान्य
४३. खालचा ओठ
४४. चित्रपट
४७. आरास
४८. सुबक अक्षर
४९. थोर, मोठा
५२. प्रश्न
५६. प्राण
६०. मवाळ धोरण
६२. वागणूक
६३. चप्पल
६४. दरी
६६. वेदनेची तिडीक
६८. श्रीरामाचे स्तोत्र कवच
७०. दर्यावर्दी
७१. शिखराचे टोक
७२. वाळवी
७४. अलीकडेच सुनामीच्या तडाख्यात सापडलेला देश
७५. धमनी
७७. चामखीळ
७८. पाय
८०. जाड दोर
८१. सरोवर, तडाग

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ९९८ चे उत्तर

आडवे उत्तर : १.हलवाई ३.कडबा ५.वाजतगाजत ९.कोस ११.लवाद १३.पाल १४.रसवान १७.तमासगीर १९.सफर २१.दार २२.रसातल २४.अज २६.डहाळी २७.तेनसिंग २८.दाम ३०.धोपटी ३२.हर हर महादेव ३५.गाज ३६.कवन ३७.तार ३८.दणका ३९.पाटी ४१.जीवन ४३.गेह ४५.मलमल ४८.वातड ४९.का ५१.मोकळाढाकळा ५३.वाटा ५४.सावकाश ५५.क्षमा ५६. सम...धान ५७.आरसा ५८.लव ६०.कलप ६१.लगाम ६२.ढगळ ६४.चकित ६७.रमावर ६८.मानधन ७०.तारका ७२.नस ७४.मौन ७६.सदनिका ७८.मद ७९.रकमपात ८०.रडतराऊत

उभे उत्तर : १.हजारदा २.वानवा ४.बालगीत ५.वाद ६.तपास ७.गालफड ८.तथ्य १०.सतत १२.वार १५.सरतेशेवटी १६.नरसिंह १८.मालदार २०.रहाटगाडगे २३.सागर २४.अधोवदन २५.जप २९.ममता ३१.टीकाकार ३३.हद्द ३४.हारजीत ३६.कपाळमोक्ष ४०.धमक ४२.वडवानल ४४.हताश ४५.लढाई ४७.लळा ४८.वारेमाप ५०.दिवसाढवळ्या ५२.कमालकिमान ५४.सार ५६.सलगता ५७.आमरस ५९.वतन ६३.गर ६५.भान ६६.मुकादम ६९.धडक ७१.रस ७२.नकार ७३.मदत ७४.मौज ७५.कृपा ७७.खंत ७८.मऊ


RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### अत्याधुनिक पूर्ण-फ्रेम चित्रण कॅमेरा व नव्या श्रेणीची झूम लेन्स सादर




पुणे (दैनिक संध्या) : कॅनन इंडियाने व्यावसायिक चित्रण क्षेत्रासाठी ई ओ एस आर ६ व्ही हा पूर्ण-फ्रेम चित्रण कॅमेरा आणि आरएफ २० -५० एफ ४ एल आय एस युएसएम ही अंगभूत विद्युत झूम सुविधेसह कंपनीची पहिली एल-श्रेणी लेन्स बाजारात सादर केली आहे. नव्या पिढीतील चित्रनिर्माते, आशय निर्माते आणि व्यावसायिक निर्मिती संस्थांची गरज लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेली ही जोडी उच्च दर्जाचे चित्रण, प्रगत दृश्यांकन, दीर्घकाळ अखंड ध्वनी-चित्र नोंदणी आणि सहज वाहून नेता येईल अशी रचना यामुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरते. हॅशटॅग इंडिया मोशन या उपक्रमाद्वारे देशातील सर्जनशील क्षेत्राला चालना देण्याच्या उद्देशाने कंपनीने हा उपक्रम हाती घेतला आहे. ३२.५ मेगापिक्सेल संवेदक, ७के खुल्या चौकटीतील ध्वनी-चित्र नोंदणी, प्रगत स्वयंचलित केंद्रीकरण, अंगभूत शीतकरण यंत्रणा, पाच-अक्ष स्थिरीकरण तसेच विद्युत झूम सुविधेमुळे चित्रपट, विवाह सोहळे, प्रादेशिक मनोरंजन आणि डिजिटल माध्यमांसाठी दर्जेदार निर्मिती करणे अधिक सुलभ होणार आहे. या कॅमेऱ्याची कमाल किरकोळ किंमत २,३५,९९५ रुपये, लेन्सची १,४२,९९५ रुपये, तर दोन्हींच्या संचाची किंमत ३,५५,९९५ रुपये निश्चित करण्यात आली आहे.


### सुनीता आहुजाचा प्रामाणिकपणा आणि निर्मळ मन झळकतंय!

पुणे (दैनिक संध्या) : नेटफ्लिक्सच्या कैदेत ठेवणाऱ्या रिॲलिटी शो लॉक अप: सच या सजामध्ये तीव्र टास्क्स, धक्कादायक खुलासे आणि गरमागरम वादविवादांच्या दरम्यान एक कैदी आपल्या उबदारपणाने आणि करुणेने सगळ्यांची मनं जिंकतेय. शिवांगी जोशीसोबतच्या एका भावनिक संवादात सुनीता आहुजा हर्षद चोपडाचं कौतुक थांबवूच शकली नाही. तिने त्याला खरंच गोड आणि दयाळू व्यक्ती म्हटलं. इतकंच नाही तर त्याला कधीही गरज भासली तर ती फक्त एका फोन कॉलवर उपलब्ध असेल असंही तिने सांगितलं. तिचा हा आईसारखा जिव्हाळ्याचा स्वभाव घरातल्या सगळ्यांच्या मनाला भिडायला लागलाय. फक्त हर्षद आणि शिवांगीच नाही, तर श्रेया कलरा आणि सूफी मोतीवाला यांनीही एका संवादात सुनीताच्या काळजीवाहू स्वभावाचं कौतुक केलं. त्यांनी मान्य केलं की सुनीता लॉक अप मध्ये स्वतःला जसंच्या तसं आणते आणि कैद्यांमध्ये तिचं मन खरंच खूप कोमल आहे, कुठलाही दिखावा नाही. सुनीता घराची भावनिक आधारस्तंभ ठरेल का? आणि हे वाढत जाणारे बंध पुढच्या प्रवासाला कसा आकार देतील? लॉक अप: सच या सजा नेटफ्लिक्सवर दररोज रात्री 8 वाजता स्ट्रीम होत आहे.

### वनप्लसचा एन6 स्मार्टफोन सादर; 8,000 एमएएच बॅटरी, तीन दिवसांचा वापराचा दावा




पुणे (दैनिक संध्या) : वनप्लसने भारतीय बाजारात वनप्लस एन६ हा नवा स्मार्टफोन सादर केला आहे. २५ हजार रुपयांखालील श्रेणीत ग्राहकांना अधिक क्षमता, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी आणि आकर्षक रचना देण्याच्या उद्देशाने हा स्मार्टफोन बाजारात आणण्यात आला आहे. यामध्ये ८,००० एमएएच क्षमतेची बॅटरी देण्यात आली असून एका पूर्ण विद्युतभरणावर तीन दिवस वापर करता येत असल्याचा दावा कंपनीने केला आहे. सलग १२.८ तास खेळ, ३५ तास समाजमाध्यमांचा वापर, २४ तास चित्रफिती पाहणे आणि ९०६ तास प्रतीक्षा अवस्थेची क्षमता असल्याचे कंपनीने म्हटले आहे. ४५ वॅट जलद विद्युतभरण सुविधेमुळे अवघ्या ४७ मिनिटांत १ ते ५० टक्के विद्युतभरण होते, तर केवळ पाच मिनिटांच्या विद्युतभरणावर सुमारे दोन तास चित्रफिती पाहता येतात. याशिवाय उलट विद्युतभरण सुविधा आणि बॅटरीचे आयुष्य वाढविण्यासाठी विशेष तंत्रज्ञानही देण्यात आले आहे. या स्मार्टफोनमध्ये ६.८ इंचांचा १२० हर्ट्झचा पडदा, ऑक्सिजनओएस १६ प्रणाली, मीडियाटेक डायमेन्सिटी ६३६० अ‍ॅपेक्स प्रक्रिया संच, १२ जीबीपर्यंत गतिमान स्मृती आणि मोठ्या आकाराची शीतकरण व्यवस्था देण्यात आली आहे. छायाचित्रणासाठी ५० मेगापिक्सेलचा मुख्य आणि ८ मेगापिक्सेलचा समोरील कॅमेरा असून कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित छायाचित्र सुधारणा, धूसरपणा कमी करणे, अनावश्यक घटक हटविणे आणि प्रतिमेची गुणवत्ता वाढविण्याची सुविधा उपलब्ध आहे. लष्करी दर्जाचे टिकाऊपणा प्रमाणन, धूळ व पाण्यापासून संरक्षण आणि मजबूत संरचनेमुळे हा स्मार्टफोन अधिक टिकाऊ असल्याचा दावा कंपनीने केला आहे.वनप्लस एन६ च्या ४ जीबी + १२८ जीबी प्रकाराची किंमत २२,९९९ रुपये, तर ६ जीबी + १२८ जीबी प्रकाराची किंमत २४,९९९ रुपये ठेवण्यात आली आहे. बँक सवलतीनंतर अनुक्रमे २०,९९९ रुपये आणि २२,९९९ रुपये मोजावे लागतील. विशेष विक्री कालावधीत या किंमती आणखी कमी होऊन अनुक्रमे १९,९९९ रुपये आणि २१,९९९ रुपये असतील.

# सोसायटीमध्ये २४० किलोवॅट क्षमतेचा रूफटॉप सौर ऊर्जा प्रकल्प स्थापित

**पुणे (दै. संध्या)**




हवामान बदलावर लक्ष केंद्रित करणारी सौर ऊर्जा वित्तपुरवठा आणि उपाययोजना करणारी कंपनी एरेमने, पुण्यातील एका मोठ्या आठ-विंगच्या निवासी गृहनिर्माण सोसायटीसाठी २४० किलोवॅट क्षमतेच्या रूफटॉप सौर ऊर्जा प्रकल्पाला वित्तपुरवठा केला आहे. यामुळे सोसायटीला सामायिक क्षेत्रातील विजेची बिले लक्षणीयरीत्या कमी करण्यास आणि कमी-कार्बन, ईव्ही-सज्ज भविष्याकडे वाटचाल करण्यास मदत होईल. हा प्रकल्प मायनस सीओ2 द्वारे कार्यान्वित करण्यात आला, ज्याने या प्रकल्पाच्या अंमलबजावणीत आणि त्याच्या सुरळीत वितरणात महत्त्वाची भूमिका बजावली.

हा प्रकल्प 'पीएम सूर्य घर - मोफत वीज योजना'च्या व्यापक दिशेचेही प्रतिबिंब आहे, ज्याचा उद्देश अनुदान सहाय्य, सुलभ ग्राहक प्रक्रिया आणि रूफटॉप सिस्टीमची अधिक उपलब्धता याद्वारे भारतातील निवासी क्षेत्रात रूफटॉप सौरऊर्जेचा अवलंब वाढवणे आहे. सामूहिक गृहनिर्माण सोसायट्या आणि निवासी समुदायांसाठी, ही योजना ईव्ही चार्जिंग पायाभूत सुविधांसह सामायिक सुविधांच्या सौरऊर्जीकरणास समर्थन देते, ज्यामुळे सामायिक वीज खर्च कमी होण्यास मदत होते आणि सामुदायिक स्तरावर स्वच्छ ऊर्जेचा अवलंब मजबूत होतो. या संदर्भात, एरेम फायनान्सचे संरचित निधी मॉडेल आणि मायनस सीओ2 ची अंमलबजावणी क्षमता, सुरुवातीचे भांडवल आणि प्रकल्प वितरण या दोन अडथळ्यांना दूर करून, योजनेचा हेतू पुण्यात प्रत्यक्ष अंमलबजावणीत रूपांतरित करण्यास मदत करत आहेत.

एरेमचे सह-संस्थापक श्री विकेश अग्रवाल म्हणाले."या पुणे गृहनिर्माण सोसायटीमध्ये, आमच्या वित्तपुरवठ्यासह केलेल्या माफक सुरुवातीच्या योगदानामुळे २४० किलोवॅट क्षमतेचा प्रकल्प, सुमारे ४३ लाख रुपयांचे सरकारी अनुदान लाभ आणि रहिवाशांना कालांतराने मिळणारी दीर्घकालीन ऊर्जा बचत शक्य झाली आहे. योग्य वित्तपुरवठा रचना मोठ्या निवासी समुदायांसाठी हेतूचे अंमलबजावणीत कसे रूपांतर करू शकते याचे हे एक उत्तम उदाहरण आहे."

"एका मोठ्या निवासी सोसायटीसाठी इतक्या मोठ्या प्रमाणावरचा प्रकल्प राबवण्यासाठी काळजीपूर्वक नियोजन, समन्वय आणि सातत्यपूर्ण कामगिरीची आवश्यकता असते," असे मायनस सीओ2 चे व्यवस्थापकीय भागीदार आणि सीईओ, श्री सिद्धार्थ देशमुख म्हणाले.

हा रूफटॉप सोलर प्लांट आता सोसायटीच्या संपूर्ण कॉमन लोडला वीज पुरवतो, ज्यामध्ये पाणी उपसा प्रणाली, लिफ्ट, सार्वजनिक भागातील प्रकाशयोजना आणि क्लबहाऊस यांचा समावेश आहे. त्याचबरोबर, तो अतिरिक्त वीज ग्रीडला निर्यात करण्यासही मदत करतो. वीज निर्मितीची मजबूत आकडेवारी आणि बचतीच्या आधारावर, सोसायटी आता आवारात इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग पॉईंट्स सुरू करत आहे, जे रूफटॉप सोलर प्लांटद्वारे चालवले जातील. याचा उद्देश सध्याच्या ईव्ही मालकांना सेवा देणे आणि रहिवाशांमध्ये ईव्हीचा व्यापक स्वीकार करण्यास प्रोत्साहन देणे हा आहे.

एरेमचे पुण्यात आधीच अनेक प्रकल्प स्थापित आहेत किंवा पाइपलाइनमध्ये आहेत, ज्यात ग्राहकांच्या गरजेनुसार तयार केलेल्या वैयक्तिक छतावरील प्रणाली आणि सार्वजनिक सुविधा प्रकल्पांचा समावेश आहे. अशा प्रकल्पांच्या माध्यमातून, वाढत्या वीज दरांना तोंड देण्यासाठी सोसायट्या आणि व्यवसायांना अधिक सक्षम बनवण्यासोबतच भारताच्या नवीकरणीय ऊर्जा आणि नेट-झिरो उद्दिष्टांमध्ये योगदान देण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे.

# विद्यार्थ्यांना शालेय क्रीडा साहित्य व शालेय वस्तूंचे वाटप

**पुणे (दै. संध्या)**




धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समिती, पुणे आणि जनहित चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भारत इतिहास संशोधन मंडळ येथे भीमाशंकर परिसरातील अतिदुर्गम भागातील ग्रामीण, आदिवासी आणि कातकरी विद्यार्थ्यांना शालेय क्रीडा साहित्य व शालेय वस्तूंचे वितरण करण्यात आले. बालसाहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ न. म. जोशी, शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त पराग ठाकूर तसेच महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या संचालिका सीमा कांबळे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास नगरसेवक प्रशांत जगताप, नगरसेवक कुणाल टिळक, नगरसेविका स्वप्नाली नितीन पंडित, सामाजिक कार्यकर्ते उदय जगताप, ॲड. गणेश सातपुते, ॲड. अरुण लंबुगोळ, श्रीरंग कला दर्पणचे अक्षय शहापूरकर, उद्योजक संदीपजी शहा, दादासाहेब गुजर, धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समिती, पुणेचे अध्यक्ष पियुष विजयकुमार शहा, उपाध्यक्ष निलेश खाणेकर, जनहित चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश ढमढेरे, सेवा मित्र मंडळाचे शिरीष मोहिते, नयी उडान संस्थेच्या रती पाटील, अविनाश घोलप तसेच उत्सव प्रमुख रोहन जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

न. म. जोशी म्हणाले, आपल्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी आपण प्रामाणिकपणे आणि योग्य पद्धतीने पार पाडली पाहिजे. सामाजिक कार्य हे मनापासून आणि तळमळीने केल्यास त्याचे समाजावर सकारात्मक परिणाम होतात.

पियुष विजयकुमार शहा म्हणाले, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांमध्येही विविध खेळांविषयी प्रचंड आवड आणि क्षमता असते. मात्र, अनेकदा आवश्यक क्रीडा साहित्य आणि साधनसामग्रीच्या अभावामुळे त्यांना आपली गुणवत्ता विकसित करण्याची संधी मिळत नाही. ही कमतरता दूर व्हावी आणि विद्यार्थ्यांना खेळासाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

# डीजीपीयूमध्ये उद्योग–शैक्षणिक सहकार्याला बळ

**पुणे (दै. संध्या)**

डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटीच्या ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी (DGPU) ने उद्योगाभिमुख शिक्षणाला अधिक बळकटी देण्यासाठी आपल्या स्कूल ऑफ फार्मसी अँड रिसर्च (DPGU SPR) मध्ये विशेष अकॅडेमिया–इंडस्ट्री इंटरॅक्शन सत्राचे आयोजन केले. या सत्रात मॅनकाइंड फार्मा लिमिटेडचे सिनियर प्रेसिडेंट – ऑपरेशन्स अभय कुमार श्रीवास्तव यांनी विद्यार्थी आणि प्राध्यापकांशी संवाद साधत औषधनिर्माण उद्योगातील बदलते प्रवाह, संधी



■ मॅनकाइंड फार्माचे वरिष्ठ अधिकारी अभय कुमार श्रीवास्तव यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

आणि अपेक्षांबाबत मार्गदर्शन केले.

शैक्षणिक गुणवत्ता, संशोधनाधिष्ठित शिक्षण, नवोपक्रम आणि उद्योग सहकार्यावर भर देणाऱ्या डीजीपीयूच्या स्कूल ऑफ फार्मसी अँड रिसर्चमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगविश्वाशी जोडण्यासाठी अशा संवादात्मक उपक्रमांचे नियमित आयोजन केले जाते.

# जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे टीसीएस रोजगार मेळावा

**पुणे (दै. संध्या)**

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या वतीने टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) कंपनीसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन सोमवार, ६ जुलै २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजल्यापासून करण्यात आले आहे. हा रोजगार मेळावा नऱ्हे येथील डॉ. सुधाकरराव जाधवर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, परिसर क्रमांक २ येथे होणार आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. शार्दूल जाधवर यांनी दिली. या रोजगार मेळाव्यात बॅक ऑफिस ऑपरेशन्स आणि डेटा प्रोसेसिंग ट्रान्झॅक्शन्स या पदांसाठी भरती केली जाणार आहे. बी.कॉम., बी.ए., बीबीए, बीबीएम, बीएमएस, बीएएफ, बीबीआय तसेच बी.एस्सी. (सीएस/आयटी) या शाखांमधून २०२४, २०२५ आणि २०२६ मध्ये पदवी प्राप्त केलेले उमेदवार या मेळाव्यासाठी पात्र आहेत. उमेदवारांकडे कमाल सहा महिन्यांचा कामाचा अनुभव असावा. वयोमर्यादा १८ ते २८ वर्षे असून कोणतेही सक्रिय बॅकलॉग नसावेत. तसेच २४x७ शिफ्ट आणि नाईट शिफ्टमध्ये काम करण्याची तयारी आवश्यक आहे.

ॲड. शार्दूल जाधवर म्हणाले, रोजगार मेळाव्यात सहभागी होणाऱ्या उमेदवारांची ॲप्टिट्यूड टेस्ट व मुलाखतीद्वारे निवड करण्यात येणार आहे. उमेदवारांनी अद्ययावत बायोडाटा, शासकीय ओळखपत्र, शैक्षणिक कागदपत्रे तसेच टीसीएसच्या नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत. पात्र उमेदवारांनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९३५६३९९६२९ किंवा ९२७०७९८५९० या क्रमांकांवर संपर्क साधावा.

# "एक होतं माळीण" चित्रपटाचा थरकाप उडवणारा टीजर

## सत्यघटनेवर आधारित "एक होतं माळीण" चित्रपटाचा टीजर सोशल मीडियावर लॉंच

**पुणे (दै. संध्या)**



माळीण गाव हे पुणे जिल्ह्याच्या आंबेगाव तालुक्यातील एक गाव. पाऊस पडावा म्हणून वरूण राजाची प्रार्थना करणारे माळीण गावातील ग्रामस्थ आदल्या दिवशी रात्री गाढ झोपी गेले आणि त्याच रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे संपूर्ण गावच त्या पावसात वाहून गेलं. कल्पनाही करता येणार नाही अशी भयावह परिस्थिती निर्माण झाली. याच सत्यघटनेवर आधारित "एक होतं माळीण" हा चित्रपट येत्या २४ जुलैला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होत असून नुकताच या चित्रपटाचा टीजर सोशल मीडियावर लॉंच करण्यात आला आहे.

ड्रीम डॉट क्रिएशन प्रोडक्शनच्या संतोष जगन्नाथ म्हात्रे यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे, तर रुपेश राणे, अरूण कोंजे, दत्तात्रय गायकर, राजु राणे हे सहनिर्माते आहेत. रॅन स्टुडिओज प्रोडक्शनचे नंदू मेहेर, रुपेश राणे, अरुण कोंजे, अक्षय म्हात्रे व राजु राणे यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. चित्रपटाची संकल्पना, कथा, पटकथा राजु राणे यांची असून दत्तात्रय गायकर आणि राजु राणे यांनी चित्रपटाचे लेखन, संवाद आणि दिग्दर्शन केले आहे. प्रशांत मोहिते, अश्विनी कासार, अभिजित श्वेतचंद्र, सिद्धी पाटणे, अनिल नगरकर, प्रशांत तपस्वी, रामचंद्र धुमाळ, अक्षय म्हात्रे, दीपज्योती नाईक, अनुज ठाकरे अशा उत्तम कलावंतांच्या चित्रपटात प्रमुख भूमिका आहेत. राजा फडतरे यांनी छायांकन, युवराज गोंगले यांनी गीतलेखन आणि संगीत दिग्दर्शन केलं असून अजय गोगावले, जावेद अली, आनंदी जोशी व हरिदास शिंदे यांनी चित्रपटातील गाणी गायली आहेत. कला नितेश नांदगावकर, व्हीएफएक्स रहमान अब्दुल्ला यांचे असून महेश भारंबे हे कार्यकारी निर्माते आहेत.

चित्रपटाची कथा ही पूर्णतः सत्य घटनेवर आधारित असून चित्रपटाचे दिग्दर्शक राजु राणे यांनी या चित्रपटासाठी माळीण गावातील ग्रामस्थांशी प्रत्यक्ष संवाद साधून, त्यांच्याकडून योग्य माहिती घेऊन अचूक कथानक मांडण्याचा पुरेपूर प्रयत्न केला आहे. चित्रपटाचे चित्रीकरण हे बदलापूर येथे करण्यात आले असून कला दिग्दर्शक नितेश नांदगावकर यांनी उभा केलेला माळीण गावचा सेट हा विशेष उल्लेखनीय आहे. दमदार कलाकार आणि उत्कृष्ट व्हीएफएक्स आणि संगीत ही या चित्रपटाची बलस्थानं असून टीजर पाहताना अंगावर शहारे येतात. अचानक झालेल्या या भयावह परिस्थितीमुळे, काय परिस्थिती त्या लोकांवर ओढवली असेल, अनेकांची भावी जीवनाची स्वप्न ही अवघ्या काही वेळात या घटनेमुळे वाहून गेली याची आपण कल्पना सुद्धा नाही करू शकत.

# तुमची इलेक्ट्रिक स्कूटर खरंच मॉन्सूनसाठी तयार आहे का?

> स्कूटर्स अधिक मजबूत आणि स्मार्ट होत असल्यामुळे मॉन्सून आता इलेक्ट्रिक टाळण्याचे कारण राहिलेले नाही. पावसाळा हा इलेक्ट्रिक स्कूटर्ससाठी अडथळा नसून, तो फक्त आणखी एक हंगाम आहे ज्यासाठी ईव्ही तयार केलेले असतात. योग्य प्रकारे बनवलेली स्कूटर आणि थोडी काळजी घेतली तर पावसात इलेक्ट्रिक चालवणे हे धोकादायक नाही, तर आजच्या काळात तेच नवे सामान्य झाले आहे.

**पुणे (दै. संध्या)**



भारतातील बहुतांश, भागात पहिला जोरदार पाऊस आला की उन्हाळ्याच्या उकाड्यातून दिलासा मिळतो. पण दोन-चाकी वाहनधारकांसाठी काही नेहमीचे प्रश्न उभे राहतात पाण्याने भरलेले अंडरपास, पाण्यात बुडालेल्या गल्ली, कमी झालेली दृश्यमानता आणि घसरट रस्ते. रोजच्या प्रवासाला हे अडथळ्यांचे मैदान बनवतात. इलेक्ट्रिक स्कूटर्स आता रोजच्या प्रवासासाठी अधिकाधिक लोकप्रिय होत आहेत. त्यामुळे प्रत्येक मॉन्सूनमध्ये रायडर्सना प्रश्न पडतो की या स्कूटर्स खरंच भारतातील जोरदार पावसाला तोंड देण्यासाठी तयार आहेत का.

थोडक्यात उत्तर आहे हो, पण तुमच्या स्कूटरची क्षमता आणि मर्यादा समजून घेतल्या पाहिजेत. आधुनिक इलेक्ट्रिक स्कूटर्स भारतीय रस्ते आणि मॉन्सून लक्षात घेऊन डिझाइन आणि टेस्ट केल्या जातात. जोरदार पाऊस आणि पाण्याने भरलेले रस्ते हे रोजच्या प्रवासाचा भाग असतात, त्यामुळे या स्कूटर्स त्याला तोंड देण्यासाठी तयार असतात. "वीज आणि पाणी एकत्र येऊ नये" ही नैसर्गिक भीती असली तरी आजच्या इलेक्ट्रिक स्कूटर्स वेगळ्या पद्धतीने बनवल्या जातात. त्यांची बॅटरी, मोटर आणि इलेक्ट्रॉनिक्स हे सर्व आंतरराष्ट्रीय IP रेटिंग्स पूर्ण करणाऱ्या सीलबंद कव्हरमध्ये सुरक्षित ठेवलेले असतात. याचा अर्थ असा की त्या धुळीपासून संरक्षित असतात आणि पाण्याच्या तात्पुरत्या संपर्कातही सुरक्षित राहतात.

स्कूटरमधील बॅटरी खालच्या भागात बसवलेली असते, जिथे पाण्याचे शिंतोडे, खड्ड्यातील पाणी आणि अनेक भारतीय शहरांमध्ये जोरदार पावसात खरोखरच पाण्यात बुडण्याची शक्यता असते. एथर एनर्जी सारखे निर्माता यासाठी खास उपाय करतात. ते आयपीएक्स७ रेटेड बॅटरी पॅक वापरतात, जे डाय-कास्ट ॲल्युमिनियम कव्हरमध्ये बसवलेले असते. ही बॅटरी एका मीटर पाण्यात तीस मिनिटे टिकण्याची क्षमता तपासून पाहिली जाते. शहरी रायडर्सना जेवढे पाणी सहसा भेटते, त्या पाण्यात स्कूटर सुरक्षितपणे आणि सुरळीत चालू राहील याची खात्री करून ही डिझाइन केली जाते.

टेस्टिंग खूप सखोल केली जाते. उदाहरणार्थ, एथर आपल्या बॅटरी पॅक्सवर फॅक्टरीतून बाहेर जाण्यापूर्वी तब्बल 272 टेस्ट्स करते. यात पाण्याचा प्रवेश आणि दीर्घकालीन टिकाऊपणा तपासला जातो. कंपनीची एट-सेव्हन्टी वॉरंटी आठ वर्षे किंवा 80,000 किमी, किमान 70% बॅटरी हेल्थची हमी हे त्या टेस्टिंगला किती गांभीर्याने घेतले जाते याचे स्पष्ट उदाहरण आहे. कंपनीने आपल्या फॅमिली स्कूटर रिझ्टा ला सुमारे 400 मिमी पाण्याच्या खड्ड्यातून चालवून दाखवले आहे, आणि ती बंद पडली नाही. तर 450 सीरिज स्कूटर्सना सुमारे 300 मिमी पाण्यात सुरक्षितपणे चालण्याची क्षमता दिली आहे.

मात्र याचा अर्थ असा नाही की रायडर्सनी मुद्दाम पाण्यातून स्कूटर चालवावी. इलेक्ट्रिक असो वा पेट्रोल स्कूटर नियम तोच आहे: जर पाण्याची खोली अंदाजता येत नसेल, तर तो रस्ता टाळणेच नेहमी सुरक्षित ठरते.

मॉन्सूनमध्ये इलेक्ट्रिक स्कूटर्सचा एक मोठा फायदा म्हणजे त्यांचा डिझाइन. पेट्रोल स्कूटर्सप्रमाणे त्यांना इंजिन एअर इनटेक किंवा एक्झॉस्ट पाइप नसतो, ज्यातून पाणी आत जाऊन इंजिन बंद पडण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे इलेक्ट्रिक स्कूटर्समध्ये हा धोका पूर्णपणे टळतो. पण फक्त पाण्यात टिकून राहणे ही गोष्ट पुरेशी नाही. खरी समस्या म्हणजे पावसामुळे रस्त्याची स्थिती बदलते. पावसाचे पाणी रस्त्यावर पडल्यावर पकड कमी होते, रस्ते घसरट होतात आणि हीच खरी हंगामाची मोठी अडचण ठरते.

ट्रॅक्शन कंट्रोल, जे आधी प्रीमियम कार्स आणि परफॉर्मन्स मोटरसायकल्समध्ये असायचे आता इलेक्ट्रिक स्कूटर्समध्ये उपलब्ध झाले आहे. एथर चे स्किडकंट्रोल सतत व्हील स्पीड आणि मोटर टॉर्क तपासते. मागचा टायर घसरायला लागला की काही मिलीसेकंदात पॉवर डिलिव्हरी ॲडजस्ट करते. त्यामुळे घसरण्याआधीच स्किड होण्याचा धोका टळतो आणि रायडरला कोणताही अतिरिक्त प्रयत्न करावा लागत नाही. 450 सीरिजमध्ये पावसाचा मोड हा मल्टी-मोड ट्रॅक्शन कंट्रोल चा भाग आहे, जो खास पावसाळी रस्त्यांसाठी डिझाइन केलेला आहे. उन्हाळ्यात किंवा कोरड्या हवेत हा फीचर लक्षात येत नाही, पण पावसाळ्यात तो खरोखरच उपयुक्त ठरतो.

जोरदार पावसामुळे रायडर इतर वाहनांना किती दिसतो हेही बदलते. इतर वाहनांचा पाण्याचा स्प्रे, कमी प्रकाश आणि ओलसर विंडस्क्रीनमुळे मागच्या ड्रायव्हर्सची प्रतिक्रिया वेळ कमी होते. यावर थेट उपाय म्हणून एथर चे इमर्जन्सी स्टॉप सिग्नल दिले आहे. अचानक ब्रेक लावल्यावर टेल लाइट आपोआप झपाट्याने फ्लॅश होतो, ज्यामुळे मागच्या वाहनांना थांबणे अधिक स्पष्टपणे दिसते आणि सुरक्षितता वाढते.

मॉन्सूनच्या आकाशामुळे दुपार धूसर आणि करड्या रंगाची होते, पण एथर चे डीपव्ह्यू™ डिस्प्ले आपोआप ब्राइटनेस ॲडजस्ट करून वाचनीय राहते. नवीन एथरस्टॅक अपडेट रायडर्सना आणखी एक सुरक्षा स्तर देते पावसात पाण्याखाली लपलेले खड्डे आणि अपघात अलर्ट्स. हे फीचर्स पावसाळ्यात विशेषतः उपयुक्त ठरतात कारण पाण्यामुळे रस्त्यावरील खड्डे दिसत नाहीत. नेव्हिगेशनही पावसात कठीण होते, पण डॅशबोर्डमध्ये इंटिग्रेटेड मॅप्स, व्हॉट्सॲप नोटिफिकेशन्स आणि लाईव्ह लोकेशन शेअरिंग रायडर्सना फोन न काढता माहिती देतात. त्यामुळे प्रवास अधिक सुरक्षित आणि सोयीस्कर होतो.

## थोडक्यात पण महत्वाचे...




## रामानंद सागर यांची 'रामायण' मालिका आधुनिक काळातील तणावावर उत्तर ठरणार

नाशिक (दैनिक संध्या) : भारतातील लोकप्रिय फ्री-टू-एअर मनोरंजन वाहिनी सोनी पल , जी आपल्या वैविध्यपूर्ण आणि दर्जेदार कार्यक्रमांसाठी तसेच व्यापक पोहोचीसाठी ओळखली जाते, अभिमानाने रामानंद सागर यांची कालजयी मालिका 'रामायण' प्रेक्षकांसाठी घेऊन येत आहे. १९८७ मध्ये प्रथम प्रसारित झालेल्या या मालिकेने भारतीय दूरचित्रवाणीच्या इतिहासात सांस्कृतिक पर्व निर्माण केले होते. प्रत्येक रविवारी सकाळी संपूर्ण देश या मालिकेसाठी थांबत असे. ७८ भागांच्या या अमर गाथेने दूरचित्रवाणीच्या चौकटीपलीकडे जाऊन भारतातील असंख्य कुटुंबांना श्रद्धा, भक्ती आणि संस्कारांच्या धाग्यात बांधले. हनुमान आणि यशोमती मय्या यांच्या यशानंतर, सोनी पल आता आपल्या भक्तिमय कार्यक्रमांच्या मालिकेला अधिक बळ देत मूळ 'रामायण' प्रेक्षकांसमोर सादर करत आहे. प्रभू श्रीरामांची ही दिव्य गाथा आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रेक्षकांना मनःशांती, स्थैर्य आणि स्पष्ट विचारांची प्रेरणा देईल. श्रद्धा आणि ज्ञानाच्या चिरंतन शक्तीची आठवण करून देणारी ही मालिका आजही तितकीच प्रेरणादायी आहे. या महाकाव्याच्या केंद्रस्थानी आहेत प्रभू श्रीराम—धर्म, करुणा आणि शौर्य यांचे मूर्तिमंत प्रतीक. माता सीता, लक्ष्मण आणि भगवान हनुमान यांच्या सहवासातील त्यांचा जीवनप्रवास आजही प्रेक्षकांच्या मनाला स्पर्श करतो आणि भक्ती, कर्तव्यनिष्ठा तसेच संकटांशी लढण्याच्या शक्तीची प्रेरणा देतो. प्रभावी कथानक आणि उत्कृष्ट अभिनयामुळे 'रामायण' ही केवळ एक मालिका नसून भारतीय संस्कृतीचा पुनर्जागरण सोहळा, आध्यात्मिक अनुभव आणि भारताच्या चिरंतन परंपरेचा गौरव आहे. "रामायण ही केवळ एक कथा नाही, तर ती भारताच्या सामूहिक स्मृतीचा अविभाज्य भाग आणि आपल्या सांस्कृतिक वारशातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. आजही ती भक्ती, एकात्मता आणि मूल्यांची प्रेरणा देते. या प्रसारणाद्वारे Sony PAL प्रत्येक घरापर्यंत अर्थपूर्ण आणि मनाला स्पर्श करणारे मनोरंजन पोहोचवण्याच्या आपल्या वचनबद्धतेची पुनर्प्रतिज्ञा करत आहे." भारताच्या महान महाकाव्याचे पुनरागमन — 'रामायण', ६ जुलैपासून, दर सोमवार ते शनिवार रात्री ८ वाजता, फक्त Sony PAL वर.




## धडक कारवाई, मेडद येथे 3.57 लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त, एकाला अटक

बारामती (दैनिक संध्या) : बारामती तालुक्यातील मेडद गावात माळेगाव पोलिसांनी अवैध गुटखा विक्रेत्यांवर मोठी कारवाई केली आहे.गुप्त माहितीच्या आधारे टाकलेल्या छाप्यात ३ लाख ५७ हजार ३२१ रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व पानमसाला जप्त करण्यात आला असून रामदास बाळू मोरे याला अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे परिसरातील अवैध गुटखा व्यवसायाला मोठा धक्का बसला आहे.पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली माळेगाव पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने ही कारवाई केली.गुप्त माहितीच्या आधारे आरोपी रामदास बाळू मोरे याला ताब्यात घेऊन त्याच्या मेडद येथील घराची झडती घेण्यात आली. अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पंचनामा करताना ३ लाख ५७ हजार ३२१ रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व पानमसाला जप्त करण्यात आला.या प्रकरणी आरोपीविरुद्ध संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून गुटखा पुरवठा साखळीतील इतर संबंधितांचा शोध पोलीस घेत आहेत.या धडक कारवाईमुळे अवैध गुटखा व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

## अपघातानंतर आर्थिक संकटात; मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी ठरला आधार

मुंबई (दैनिक संध्या) : गंभीर अपघातामुळे उपचारासाठी आर्थिक अडचणीत सापडलेल्या १०० वर्षीय सरूबाई मुंजवार यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले. या सहाय्यामुळे त्यांच्यावर आवश्यक शस्त्रक्रिया वेळेत पार पडून पुढील उपचार तातडीने सुरू करणे शक्य झाले. सरूबाई मुंजवार या रस्ता ओलांडत असताना भरधाव दुचाकीच्या धडकेत गंभीर जखमी झाल्या. या अपघातात त्यांच्या डाव्या मांडीला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर त्यांना फलटण येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. उपचारासाठी सुमारे सव्वा लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याने त्यांच्या कुटुंबासमोर आर्थिक अडचण निर्माण झाली. नातेवाईकांच्या माध्यमातून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी योजनेची माहिती मिळाल्यानंतर रुग्णालयाच्या सहकार्याने २५ जून रोजी आर्थिक सहाय्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीकडे अर्ज सादर करण्यात आला. अर्ज प्राप्त होताच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाने आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून प्रकरणावर तातडीने कार्यवाही केली. अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्यास मंजुरी देण्यात आली. त्यामुळे उपचारात कोणताही विलंब न होता आवश्यक वैद्यकीय सेवा वेळेत उपलब्ध होऊ शकली. या आर्थिक मदतीबद्दल सरूबाई मुंजवार यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षामार्फत गरजू रुग्णांना उपचारासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य कमीत कमी कालावधीत उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जात आहे. सरूबाई मुंजवार यांच्या प्रकरणात अर्ज प्राप्त होताच आवश्यक पडताळणी व कार्यवाही पूर्ण करून अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्यास मंजुरी देण्यात आली. आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यास मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून अल्पावधीत आर्थिक सहाय्य मंजूर करण्याची कार्यपद्धती अवलंबिली जाते. गरजू रुग्णांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत अधिक माहिती अथवा मार्गदर्शनासाठी टोल फ्री क्रमांक १८०० १२३ २२११ वर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# ‘राष्ट्रप्रथम’ ही भावना महाराजांनी रुजवली - पांडुरंग बलकवडे

पुणे (दै. संध्या) :

हजार वर्षांच्या गुलामगिराच्या बेड्या तोडून हिंदवी स्वराज्य उभे करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे ख-या अर्थाने युगपुरुष होते असे उद्गार ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांनी गुरुवारी काढले.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सहकार नगर येथील अरण्येश्वर प्रभात शाखेच्या ‘हिंदु साम्राज्य दिन’ उत्सवात ते बोलत होते. संघचालक अविनाश धोमकर व ज्येष्ठ पत्रकार आणि दैनिक पुढारीचे कार्यकारी संपादक सुनील माळी यावेळी उपस्थित होते.



छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन हा संघातर्फे हिंदु साम्राज्य दिन म्हणून साजरा केला जातो.या उत्सवात बोलतांना श्री बलकवडे यांनी शिवाजी महाराजांच्या चरित्रातील घटनांचा उल्लेख करत त्यामागील सूत्र सांगितले.परदेशातील लोक संस्कृती विसरले,म्हणून त्या संस्कृती नष्ट झाल्या.पण भारतात राज्यकर्त्यांनी व धर्मरक्षकांनी आपल्या प्राचीन संस्कृतीची नाळ सोडली नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनात प्रभु रामचंद्रांचे चारीत्र्य आणि भगवान श्रीकृष्णाची राजनीती होती. त्यामुळे ते यशस्वी झाले असे सांगून ते म्हणाले,

महाराजांचा स्वराज्याइतकाच सुराज्यावरही भर होता.त्यामुळे इथला शेतकरी कसा सुखी होईल याची चिंता त्यांनी केली.शेतकरी सुखी व संपन्न झाल्यामुळे बारा बलुतेदारांचे उत्पन्न वाढले, रोजगार निर्माण झाला आणि राज्याचे उत्पन्नही वाढले. रयतेवरचे कर कमी करुनही राज्याचं उत्पन्न वाढविणारा एकमेव राजा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख करावा लागेल असे ते म्हणाले.

महाराजांनी सांस्कृतिक क्रांती बरोबरच धर्म, कृषी,अर्थ ,संरक्षण आणि राजव्यवहार या वेगवेगळ्या क्षेत्रात महत्वाचे निर्णय घेतले. त्यामुळेच त्यांच्या राज्याला रामराज्य म्हटले जाऊ लागले असे सांगून ते म्हणाले की सामान्य माणसातून महाराजांनी असामान्य माणसं घडवली. सर्वस्व राष्ट्रार्पण ही भावना त्यांच्यात बिंबवल्यामुळे या सहका-यांनी अशक्यप्राय वाटणारी कामगिरी सहजपणे पार पाडली असेही श्री बलकवडे म्हणाले.

प्रारंभी सुनील माळी यांनी बलकवडे यांचा परिचय करुन दिला.बलकवडे यांनी केलेला अभ्यास म्हणजे एक प्रकारचं तप आहे.या साधनेमुळेच त्यांच्या लिखाणाला एक प्रकारचे वजन प्राप्त झाले आहे असे ते म्हणाले.

सुहास काणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.भूषण करमरकर यांनी सांघिक गीत सांगितले. जे.डी. कुलकर्णी यांनी वैयक्तिक पद्य म्हटले.शिरीष वनारसे यांनी अमृतवचनाचे व संजीव खळदकर यांनी बोधवाक्याचे वाचन केले.

## राज्यस्तरीय कृषी पुरस्कार वितरण समारंभात तालुक्यातील तीन शेतकऱ्यांचा सन्मान : सचिन हाके



बारामती (दै. संध्या) :

कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी सन २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षांचे राज्यस्तरीय कृषी पुरस्कार वितरण समारंभ १ जुलै रोजी सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम, वरळी (मुंबई) येथे आयोजित करण्यात आला; यामध्ये तालुक्यातील तीन शेतकऱ्यांना राज्यस्तरीय कृषी पुरस्कारांने सन्मानित करण्यात आले.

यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे आदी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचे शेतकऱ्यांना वितरण करण्यात आले.

**वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराने काटेवाडीचे यतीन घुले सन्मानित**

यामध्ये ऊस व केळी पिकांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा तसेच शास्त्रीय पीक व्यवस्थापनाचा अवलंब करून उत्पादनात सातत्याने वाढ साधणारे आणि इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणारे काटेवाडी येथील यतीन बापुराव घुले यांना 'वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

**वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्काराने तांदुळवाडीचे योगेश नालंदे सन्मानित**

कृषीविषयक योजना, आधुनिक तंत्रज्ञान आणि शेतीविषयक माहितीचा प्रसार करणाऱ्या 'शेतकरी योद्धा' वृत्तपत्राचे संस्थापक तांदुळवाडी येथील योगेश नामदेव नालंदे यांना 'वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

**जिजामाता कृषीभूषण पुरस्काराने कुरणेवाडीच्या छाया पवार सन्मानित**

महिला शेतकऱ्यांसाठी दिला जाणारा 'जिजामाता कृषीभूषण पुरस्कार' कुरणेवाडी येथील छाया तानाजी पवार यांना प्रदान करण्यात आला. त्यांनी सोयाबीन, हरभरा, ऊस आदी पिकांचे सुधारित वाण, स्वतःच्या शेतात बीजोत्पादन, तसेच महिला बचत गटांच्या माध्यमातून हळद, शेंगदाणे व कडधान्य पिकांवर प्रक्रिया करून मूल्यवर्धनाच्या व्यवसायातून उल्लेखनीय प्रगती साधली आहे.

या पुरस्कार विजेत्या शेतकऱ्यांच्या सन्मानामुळे तालुक्याच्या कृषी क्षेत्राच्या कार्याला राज्यस्तरावर दखल घेतली आहे, या यशस्वी शेतकऱ्यांच्या कार्यातून इतर शेतकऱ्यांनाही प्रेरणा मिळणार आहे, अशी माहिती तालुका कृषी अधिकारी सचिन हाके यांनी दिली आहे.

## समृद्धी दीपक गाडीलकर या विद्यार्थिनीचा राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक

बारामती (दै. संध्या) :

विद्या प्रतिष्ठान स्कूल ऑफ आर्किटेक्चर,महाविद्यालय बारामतीमधील शैक्षणिक वर्ष २०२५ बॅचमधील विद्यार्थिनी कु.समृद्धी दीपक गाडीलकर हिने कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर,नवी दिल्ली यांच्या वतीने एम.आर्च प्रवेश प्रक्रियेसाठी पोस्ट ग्रॅज्युएट एंट्रन्स टेस्ट इन आर्किटेक्चर (PGETA 2025) परीक्षा घेण्यात आली होती.

या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत कु.समृद्धी दीपक गाडीलकरने १०० पर्सेंटाइलसह अखिल भारतीय प्रथम क्रमांक मिळवून संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर,नवी दिल्ली यांच्या वतीने तिला दोन वर्षांसाठी प्रतिवर्ष ₹ २५,०००/- प्रमाणे एकूण ₹ ५०,०००/- ची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार आहे.गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी ही शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना दिली जाते. हे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व्यावसायिक शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या विद्या प्रतिष्ठानच्या ध्येयधोरणाचे प्रतीक आहे.संस्थेने उपलब्ध करून दिलेले उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण, आधुनिक पायाभूत सुविधा आणि विद्यार्थी-केंद्रित शिक्षणपद्धती यामुळे



विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करता येत असल्याचे या यशातून पुन्हा अधोरेखित झाले आहे.या यशाबद्दल विद्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा.श्री. शरदचंद्रजी पवार,उपाध्यक्ष अँड. अशोक प्रभुणे,खजिनदार श्री.युगेंद्र दादा पवार,सचिव अँड.नीलिमाताई गुजर,विश्वस्त मा. विठ्ठलदास मणियार, मा.सौ.सुप्रियाताई सुळे,मा. सुनेत्रावहिनी पवार,संस्थेचे सदस्य मा.बाळासाहेब तावरे पाटील,डॉ. राजीव शहा,श्री.किरण गुजर, श्री.मंदार सिकची,श्री.प्रतापराव पवार तसेच प्राचार्या.राजश्री पाटील, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी समृद्धीचे अभिनंदन करून तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## राज्यस्तरीय शेतीमित्र पुरस्कार राज्यपाल महोदय यांच्या हस्ते योगेश नालंदे यांना प्रदान

बारामती (दै. संध्या) :

1 जुलै रोजी कृषी दिनाचे औचित्य साधत महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने महाराष्ट्रातील विविध विभागातून शेती क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात येतो. बारामती मधील युवा पत्रकार योगेश नालंदे यांना 2024 सालचा वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार देण्यात आला.हा पुरस्कार राज्यपाल श्री.जीष्णू देव वर्मा यांच्या हस्ते देण्यात आला.यावेळी श्री देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री,सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री,दत्तात्रय भरणे कृषिमंत्री,आशिष जयस्वाल कृषी राज्यमंत्री,भरत शेठ गोगावले व इतर मान्यवर उपस्थित होते.अवघ्या एक वर्षात तब्बल 365 शेतकऱ्यांच्या यशोगाथा शोधून त्यांना वृत्तपत्राच्या माध्यमातून मोठी प्रसिद्धी दिली. या यशोगाथांच्या माध्यमातून हजारो शेतकऱ्यांना फायदा व्हावा आणि



सकारात्मक शेती संदेश सर्वांपर्यंत पोहोचावा यासाठी कृषी प्रसाराचे मोठे कार्य केले.कृषी वाहिनीवर काम करताना बाजारभाव,हवामान अंदाज आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती देणारे नाट्यरूपंतर ऑडिओ बनवून रेडिओ वरून प्रसारित केले. यासह कृषी विभागाच्या योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत डिजिटल माध्यमातून पोहचली जाते.यासाठी शेतकरी योद्धा या वृत्तपत्राची सुरवात नालंदे यांनी केली आहे.हा कार्यक्रम मुंबई येथे संपन्न झाला. कृषी विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती दिली.

## लहू उघडे नेकेड अँड अफ्रेड : आदिमानवमध्ये विजयी

- डिस्कव्हरीच्या आंतरराष्ट्रीय ॲडव्हेंचर सर्व्हायव्हल फ्रँचायझीची भारतीय आवृत्ती
- शोमधील सहा सर्व्हायव्हलिस्टपैकी एक असलेल्या पुणेस्थित गिर्यारोहकाने वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीच्या जगप्रसिद्ध ॲडव्हेंचर सर्व्हायव्हल फ्रँचायझीच्या भारतीय आवृत्तीत विजय मिळवला

मुंबई (दै. संध्या) :

अनेक दिवस आव्हानात्मक दुर्गम भू-प्रदेश, मर्यादित साधनसंपत्ती आणि सतत बदलणाऱ्या परिस्थितीशी झुंज दिल्यानंतर लहू उघडे हे वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीच्या नेकेड अँड अफ्रेड: आदिमानव चे विजेते ठरले आहेत. आपल्या एव्हरेस्ट शिखर सर करण्यासाठी आणि वर्षानुवर्षांच्या निसर्गातील अनुभवासाठी ओळखले जाणारे लहू हे डिस्कव्हरीच्या या नावाजलेल्या आंतरराष्ट्रीय ॲडव्हेंचर सर्व्हायव्हल फ्रँचायझीच्या भारतीय आवृत्तीचे पहिले विजेते बनले आहेत. आशिया पॅसिफिक प्रदेशातील आपल्या पहिल्या पदार्पणासह, हा शो आदिमानव जीवनशैलीशी निगडित प्रवृत्ती, चिकाटी आणि सर्व्हायव्हल कौशल्यांने प्रेरित आहे.




नेकेड अँड अफ्रेड: आदिमानव ने विविध पार्श्वभूमीतून आलेल्या सहा सहभागींना एकत्र आणले आणि त्यांना फिलिपाइन्समधील पालावानच्या आव्हानात्मक रानावनात ठेवले. या संपूर्ण प्रवासादरम्यान त्यांनी कठोर परिस्थितीला तोंड दिले, अनोळखी प्रदेशातून वाट काढली आणि जिथे प्रत्येक निर्णय महत्त्वाचा ठरतो अशा वातावरणाशी जुळवून घेतले.

लहू यांच्यासाठी हा विजय निसर्गाशी असलेल्या आयुष्यभराच्या नात्याची परिपूर्ती होता. पुण्याचे रहिवासी असलेल्या आणि सिंहगडाच्या ओबडधोबड परिसरात वाढलेल्या लहू यांना लहानपणापासूनच निसर्ग, ट्रेकिंग आणि गिर्यारोहणाची ओढ निर्माण झाली, आणि पुढे जाऊन त्यांनी माउंट एव्हरेस्ट सर केला. नेकेड अँड अफ्रेड: आदिमानव मध्ये त्या अनुभवाचे रूपांतर शांत निर्णयक्षमता, जुळवून घेण्याची वृत्ती आणि कठीण परिस्थितीतही स्थिर राहण्याच्या क्षमतेत झाले. शोच्या संपूर्ण प्रवासात लहू यांनी आपल्या गटात एक विश्वासार्ह आधारस्तंभ म्हणून स्वतःला सिद्ध केले; रानावनाच्या आव्हानांना सामोरे जाताना आपल्या सर्व्हायव्हल कौशल्यांचा वापर करत त्यांनी सहभागींना उबदार आणि सुरक्षित ठेवण्यास मदत केली. त्यांची चिकाटी, युक्तीशीलता आणि कोणत्याही परिस्थितीला तोंड देऊ शकतो हा अढळ आत्मविश्वास यामुळेच अखेरीस त्यांना प्रत्येक आव्हानावर मात करत विजेते ठरण्यास मदत झाली.

आपल्या विजयावर प्रतिक्रिया देताना लहू उघडे म्हणाले, “नेकेड अँड अफ्रेड: आदिमानव जिंकणे हा माझ्यासाठी अत्यंत खास क्षण आहे. या अनुभवाने मला अशा प्रकारे आव्हान दिले जे मी कधीच अपेक्षित केले नव्हते आणि आयुष्यभर लक्षात राहतील असे धडे शिकवले. काही कठीण दिवस होते, मनात शंकेचे क्षण होते आणि अशा परिस्थिती होत्या ज्यांनी मला आजवर कधीही नव्हते इतके खोलवर शोधण्यास भाग पाडले. मागे वळून पाहताना, मला प्रत्येक आव्हानाबद्दल कृतज्ञता वाटते, कारण त्यामुळेच हे यश आणखी अर्थपूर्ण ठरले.”

नेकेड अँड अफ्रेड: आदिमानव चे सर्व भाग डिस्कव्हरी आणि डिस्कव्हरी+ वर उपलब्ध आहेत.

# पावसाळा सुरू होताच मुलांमध्ये पोटाचे संसर्ग

पुणे (दै. संध्या) :

पावसाळा सुरू होताच मुलांमध्ये ताप, पोटाचे संसर्ग, डासांमुळे होणारे आजार; तसेच दूषित पाण्यामुळे होणाऱ्या आजारांच्या रुग्णसंख्येत वाढ होत असल्याचे निरीक्षण तज्ज्ञांनी नोंदवले आहे. साचलेले पाणी, अस्वच्छ अन्न, दूषित पिण्याचे पाणी आणि अस्वच्छता यामुळे डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया, टायफॉइड, गॅस्ट्रोएन्टरायटिस (पोटाचा संसर्ग), कॉलरा आणि लेप्टोस्पायरोसिस यांसारख्या आजारांचा धोका वाढत असल्याने पालकांनी विशेष सतर्क राहण्याची गरज असल्याचे आवाहन करण्यात आले आहे.

‘सूर्या मदर अँड चाइल्ड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल’चे सल्लागार बाल पचनसंस्थातज्ज्ञ डॉ. प्रतीक अगरवाल यांनी सांगितले, की मे आणि जून महिन्यांत पाण्याशी संबंधित समस्या असलेल्या भागांतून येणाऱ्या मुलांमध्ये पोटाच्या



### फ्लू आणि टायफॉइडच्या रुग्णांमध्येही वाढ

संसर्गाच्या रुग्णांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. अनेक मुलांना तीव्र पोटदुखी, उलट्या, जुलाब आणि काही प्रकरणांमध्ये शौचातून रक्त येण्याची तक्रार आढळत आहे. ‘माझ्याकडे रुग्णालयात दर महा सुमारे २५० ते ३०० पोटाच्या संसर्गाचे रुग्ण उपचारासाठी येतात. पैकी दररोज एक ते दोन मुलांना शरीरातील पाणी कमी होणे किंवा काहीही खाता-पिता न आल्यामुळे रुग्णालयात दाखल करावे लागत आहे,’ असे डॉ. अगरवाल यांनी नमूद केले. ‘एचवनएनवन’ आणि ‘इन्फ्लूएंझा ए’ या आजारांच्या रुग्णांमध्येही वाढ होत आहे. या आजारांमध्ये सामान्यतः १०२ ते १०३ फॅरनहाइटपर्यंत ताप, अंगदुखी आणि श्वसनाचा त्रास अशी लक्षणे दिसून येतात. दर महिन्याला १०० ते १५० फ्लूसदृश लक्षणे असलेले रुग्ण बाह्यरुग्ण विभागात (ओपीडी) येतात. पैकी सुमारे २० मुलांना उपचारासाठी दाखल करावे लागते. याशिवाय, सुट्टीनंतर परतलेल्या मुलांमध्ये टायफॉइडचे रुग्णही वाढले असून, गेल्या महिन्यात आठ मुलांच्या तपासणीत टायफॉइडची खात्री होते,’असेही डॉ. अगरवाल यांनी स्पष्ट केले. तज्ज्ञांच्या मते, डेंग्यूमध्ये जास्त ताप, डोकेदुखी, अंगदुखी, मळमळ, उलट्या किंवा अंगावर पुरळ येऊ शकते. मलेरियामध्ये ताप, थंडी वाजणे आणि घाम येणे ही प्रमुख लक्षणे असतात. टायफॉइडमध्ये सतत ताप, थकवा, पोटदुखी, बद्धकोष्ठता किंवा जुलाब होऊ शकतात. गॅस्ट्रोएन्टरायटिसमध्ये उलट्या, पोटात मुरडा आणि वारंवार जुलाब होतात. पुराच्या किंवा दूषित पाण्याच्या संपर्कात आल्यास, विशेषतः त्वचेवर जखम असल्यास,

**ही लक्षणे दिसल्यास त्वरित डॉक्टरांकडे जा**

- ४८ तासांपेक्षा जास्त काळ ताप राहणे
- वारंवार उलट्या होणे, शौचातून रक्त येणे
- लघवीचे प्रमाण कमी होणे, खूप झोप येणे किंवा बेशुद्धपणा
- श्वास घेण्यास त्रास होणे
- शरीरातील पाणी कमी झाल्यास

लेप्टोस्पायरोसिस होण्याची शक्यता असते. "पावसाळ्यात मुलांची तब्येत झपाट्याने बिघडू शकते. उलट्या आणि जुलाबामुळे शरीरातील पाणी कमी होण्याचा धोका असतो. सुरुवातीला ताप हा साधा व्हायरल ताप असल्याचे वाटू शकते. त्यामुळे पालकांनी मुलाचे पाणी आणि अन्न घेण्याचे प्रमाण, लघवीचे प्रमाण, उलट्या-जुलाबांची वारंवारता आणि तापाचा प्रकार यावर बारकाईने लक्ष ठेवावे.

लक्षणे आपोआप कमी होतील, अशी वाट न पाहता आवश्यक असल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा."- डॉ. प्रतीक अगरवाल पावसाळ्यात आजारांपासून बचावासाठी उकळलेले किंवा फिल्टर केलेले पाणी पिणे, कापलेली फळे, कच्चे सॅलड आणि उघड्यावर मिळणारे रस्त्यावरील अन्न टाळणे, जेवण्यापूर्वी आणि शौचालय वापरल्यानंतर साबणाने हात धुणे, कुलर, ट्रे, बादल्या आणि कुंड्यांमधील साचलेले पाणी दर आठवड्याला रिकामे करणे तसेच डासांपासून बचावासाठी रिपेलंट, मच्छरदाणी आणि पूर्ण बाह्यांचे कपडे वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...





### मीनल यादव यांच्या वाढदिवसानिमित्त 'एसटी स्मार्ट कार्ड' शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

पिंपरी (दैनिक संध्या) : माजी नगरसेविका मीनल यादव यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'एसटी स्मार्ट कार्ड' शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद माजी नगरसेविका मीनल विशाल यादव यांच्या वाढदिवसानिमित्त मोहन नगर येथील त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात दि.३० जून ते १ जुलै दरम्यान एसटी स्मार्ट कार्ड (NCMC) नोंदणी व वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून मोहननगर, काळभोरनगर, रामनगर परिसरातील ४५० हून अधिक नागरिकांनी सहभाग नोंदवून या सुविधेचा लाभ घेतला. प्रवाशांना सवलतीच्या दरात प्रवास करण्यासाठी स्मार्ट कार्ड आवश्यक असल्याने नागरिकांनी मोठ्या प्रमाणात शिबिरात उपस्थिती दर्शविली. ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच विविध घटकांतील नागरिकांनी कार्ड नोंदणी करून घेतली. या शिबिराचे उद्घाटन उपमहापौर शर्मिला बाबर, क्रीडा सभापती कैलास कुटे आणि भाजप सरचिटणीस वैशाली खाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते संजय जगताप, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष कमलेश मुथा, नागेश नामदे, अशोक काशीद, ज्येष्ठ नागरिक तसेच परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी बोलताना उपस्थित मान्यवरांनी नागरिकांसाठी उपयुक्त अशा सेवा व शासकीय योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचे परिसरातील नागरिकांनी स्वागत केले.

### अण्णा भाऊ साठे विचार प्रबोधनपर्व 2026 निमित्त - आढावा बैठकीचे आयोजन

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड शहरात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विचार प्रबोधन पर्वाचे आयोजन दरवर्षी १ ते ५ ऑगस्ट या कालावधीत भक्ती शक्ती चौक,निगडी येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे स्मारक परिसरात आयोजीत करण्यात येते.यामध्ये शहरातील सामाजिक संस्था, विविध शैक्षणिक व इतर संस्था, ट्रस्ट, कामगार संघटना, व्यक्ती कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात सहभागी होत असतात. त्या अनुषंगाने यावर्षीही पिंपरी चिंचवड शहरात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विचार प्रबोधन पर्वाचे आयोजन करण्यात येणार आहे.यासाठी विचार विनिमय करण्यासाठी महापालिका पदाधिकारी तसेच साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी व पोलिस प्रशासन, महापालिका अधिकारी आदी सर्वांची समन्वय बैठक महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवार, दि.२ जुलै २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता महानगरपालिकेमधील दिवंगत माजी महापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर बैठकीस संबंधित मान्यवरांनी उपस्थित रहावे असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.



### एचएसआरपी नंबरप्लेट नसल्यास कारवाई

पिंपरी (दैनिक संध्या) : सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राज्यातील २०१९ पूर्वीच्या सर्व वाहनांना उच्च सुरक्षा नंबरप्लेट (एचएसआरपी) बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे; यासाठी परिवहन विभागाकडून पाच वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. तरी देखील पिंपरी- चिंचवडमधील अनेक वाहनधारकांनी एचएसआरपी नंबरप्लेट बसविण्यात उदासीनता दाखविल्याचे दिसून येत आहे. एचएसआरपी नंबरप्लेट बसविण्याची ३० जून २०२६ अंतिम मुदत होती; मात्र आता १ जुलैपासून एचएसआरपी नंबरप्लेट नसलेल्या वाहनांवर कारवाई करण्याचा इशारा आरटीओकडून देण्यात आला आहे. परिवहन विभागाच्या नियमांनुसार १ जुलै २०२६ पासून ज्या वाहनांवर एचएसआरपी नंबर प्लेट नसेल अशा वाहनधारकांवर पिंपरी- चिंचवड आरटीओ आणि पोलिस प्रशासनाकडून संयुक्तपणे कडक दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. तसेच ज्या वाहनांना एचएसआरपी प्लेट नसेल, त्यांची आरटीओ अंतर्गत सर्व कामे रोखली जाणार आहेत. १ जुलैपासून वाहनाला एचएसआरपी नंबर प्लेट नसेल तर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) वाहन हस्तांतरण, पत्ता बदल करणे, वाहनावरील कर्जबोजा चढवणे किंवा उतरविणे, वाहनाची पुनर्नोंदणी, वाहनातील बदलांची नोंद, परवाना किंवा संबंधित नूतनीकरणाची प्रकिया सेवा मिळण्यास अडचणी येणार आहेत.

### पिंपळे गुरव बीआरटीएस मार्गावरील सुरक्षा केबिन ठरली अडथळा

पिंपळे गुरव (दैनिक संध्या) : कल्पतरू बीआरटीएस मार्गालगत पदपथावर उभारण्यात आलेली वाहतूक सुरक्षारक्षकांची केबिन सध्या प्रशासकीय दुर्लक्षाचे प्रतीक बनली आहे. ही केबिन पादचाऱ्यांसाठी मोठा अडथळा ठरत आहे. एकेकाळी बीआरटीएस मार्गावरील वाहतुकीचे नियमन करण्यासाठी सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांच्या कामकाजासाठी लाखो रुपये खर्च करून ही केबिन उभारण्यात आली होती. मात्र, आज या मार्गावर सुरक्षारक्षक कुठेही कार्यरत दिसत नसल्याने ही केबिन केवळ अडगळ ठरत आहे. महापालिकेच्या सार्वजनिक निधीतून उभारण्यात आलेली ही केबिन सध्या पदपथाच्या मध्यभागी उभी असल्याने नागरिकांना चालण्यासाठी उपलब्ध असलेली जागा कमी झाली आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती, महिला आणि विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पदपथावरील अडथळ्यामुळे अनेकांना थेट वाहनांच्या वर्दळीच्या रस्त्यावरून चालावे लागत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाही या परिस्थितीचा फटका बसत आहे. सुरक्षेसाठी उभारण्यात आलेली ही केबिन आज सुरक्षेलाच धोका निर्माण करत असल्याचे चित्र आहे. वापर शून्य असलेल्या या केबिनमुळे नागरिकांची गैरसोय शंभर टक्के होत असल्याची भावना परिसरातील रहिवाशांनी व्यक्त केली आहे. जेथे सुरक्षारक्षकच नाहीत, तेथे ही केबिन कशासाठी ठेवली आहे? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत.

# पुणे ते लोणावळा रेल्वे मार्गावरील ट्रॅकच्या अहवालातील त्रुटी दुरुस्त करा

## खासदार श्रीरंग बारणे यांची रेल्वे बोर्डाच्या निदेशकांकडे मागणी

पिंपरी (दै. संध्या)

पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकबाबत मध्य रेल्वेने काही त्रुटी काढल्या आहेत. हा प्रस्ताव पुन्हा रेल्वे बोर्डाकडे आला आहे. त्यामुळे रेल्वे बोर्डाने त्रुटी तत्काळ दूर कराव्यात. परिपूर्ण प्रस्ताव तयार करण्याची मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी रेल्वे बोर्डाच्या निदेशकांकडे केली.

खासदार बारणे यांनी रेल्वे बोर्डाचे निदेशक फखरुद्दीन अली अहमद यांची भेट घेतली. त्यांना याबाबतचे सविस्तर निवेदन दिले. सध्या पुणे-लोणावळा लोकलच्या दिवसभरात ६०.५९ किलोमीटर अंतर कापत दररोज लाखो प्रवाशांची ने-आण करीत ४४ फेऱ्या होतात. या मार्गावर असणारा लांब पल्ल्यांच्या गाड्यांचा ताण लक्षात घेता उपनगरीय सेवेसाठी स्वतंत्र मार्गाची अनेक वर्षांपासून



खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडून मागणी केली जात होती. त्यानुसार त्यांचा केंद्र, राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा सुरु होता. त्यांच्याच प्रयत्नातून या मार्गावर तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकसाठी २०१७ मध्ये मान्यता मिळाली आहे. पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात तरतूद केली आहे. मुंबई रेल्वे विकास महामंडळामार्फत सादर करण्यात आलेल्या पुणे ते लोणावळा दरम्यान उपनगरीय रेल्वेच्या तिसऱ्या व चौथ्या ट्रॅकच्या या प्रकल्पाचा एकूण खर्च पाच हजार १०० कोटी रुपये आहे. त्यामध्ये जमीन अधिग्रहण खर्चाचाही समावेश आहे. यातील ५०.५० टक्के आर्थिक सहभागाची जबाबदारी केंद्र सरकार व राज्य शासन उचलणार आहे. राज्य शासनाचा एकूण वाटा दोन हजार ५५० कोटी रुपये इतका निश्चित करण्यात आला आहे.

खासदार बारणे म्हणाले, पुणे-लोणावळा तिसऱ्या, चौथ्या ट्रॅकला मान्यता मिळाली आहे. मध्य रेल्वेने त्यात काही त्रुटी काढल्या आहेत. प्रस्ताव पुन्हा रेल्वे बोर्डाकडे आला आहे. रेल्वे बोर्डाची मान्यता मिळाल्यानंतर प्रस्ताव निती आयोगाकडे जाईल. त्यानंतर केंद्राकडून मान्यता मिळेल. त्यामुळे रेल्वे बोर्डाने तातडीने त्रुटींची दुरुस्ती करावी.

परिपूर्ण प्रस्ताव तातडीने द्यावा. हा प्रस्ताव निधीसाठी निती आयोगाकडे जाईल. त्यानंतर केंद्रीय मंत्रीमंडळाची मान्यता मिळेल. त्यानंतर कामाला प्रत्यक्षात कामाला सुरुवात होईल. या प्रक्रियेला चार ते पाच महिन्यांचा कालावधी जाईल. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना या प्रकल्पाला गती मिळाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासाठी निधीची तरतूद करुन ठेवली आहे.

## पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पासाठी आज उच्चस्तरीय बैठक

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहराच्या भविष्यातील पाणीसुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाबाबत मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दि. ३ जुलै २०२६ रोजी मुंबई येथे उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व प्रमुख लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांना मुख्यमंत्री सचिवालयामार्फत अधिकृत निमंत्रण देण्यात आले आहे.

या बैठकीस महापौर श्री. रवि लांडगे यांच्यासह खासदार श्री. श्रीरंग बारणे, विधानसभा उपाध्यक्ष श्री. अण्णा बनसोडे, आमदार श्री. महेश लांडगे, श्री. शंकर जगताप, श्रीमती उमा खापरे, श्री. अमित गोरखे तसेच उपमहापौर श्रीमती शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती श्री. अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते श्री. प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब भोईर आणि भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष श्री. शत्रुघ्न काटे उपस्थित राहणार आहेत.

पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प हा पिंपरी-चिंचवड शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करून भविष्यातील सुरक्षित, शाश्वत आणि अखंड पाणीपुरवठा सुनिश्चित करणारा महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. सध्या खुल्या कालव्याद्वारे पाणीपुरवठा होत असल्याने पाणीगळती, बाष्पीभवन, अतिक्रमणे, प्रदूषणाचा धोका तसेच देखभालीतील अडचणी निर्माण होत आहेत. बंदिस्त जलवाहिनीची उभारणी झाल्यानंतर या समस्यांवर प्रभावी नियंत्रण मिळविणे शक्य होणार असून, पाण्याची बचत, जलवाहतुकीची कार्यक्षमता आणि भविष्यातील पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता अधिक सक्षम होणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प केवळ पाणीपुरवठ्याचा नसून पिंपरी-चिंचवड शहराच्या दीर्घकालीन जलसुरक्षेचा भक्कम पाया मानला जात आहे. या प्रकल्पास गती मिळावी यासाठी महापौर श्री. रवि लांडगे यांच्यासह महायुतीतील सर्व घटक पक्षांचे लोकप्रतिनिधी व प्रमुख पदाधिकारी यांनी सातत्याने राज्य शासनाकडे पाठपुरावा केला असून, प्रकल्पावरील प्रलंबित प्रश्न मुख्यमंत्री स्तरावर चर्चेस यावेत यासाठीही प्रयत्न केले आहेत.

## सिक्युरिटी व्यावसायिकाकडून खंडणी स्विकारताना आरोपीला अटक; ११ लाखांचा मुद्देमाल जप्त

पिंपरी (दै. संध्या)

सिक्युरिटी व्यवसाय बंद पाडण्याची धमकी देत तीन लाख रुपयांची खंडणी स्वीकारणाऱ्या आरोपीला पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने अटक केली आहे. आरोपीकडून रोख रक्कम, वाहन व मोबाईल असा एकूण ११ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नवी सांगवी येथील सिक्युरिटी व्यवसायिक श्रीकांत बाबर व कंपनीतील सुपरवायझर संदीप कणसे यांना आरोपी महेश सखाराम शिरोळे (रा.मेदनकरवाडी, खेड) याने फोन करून व्यवसाय बंद पाडण्याची धमकी दिली होती. तसेच व्यवसाय चालवायचा असेल तर ३ लाख रुपयांची खंडणी मागितली होती. खंडणी न दिल्यास व्यवसाय उद्ध्वस्त करून खल्लास करण्याची धमकी आरोपीने दिली होती.

या प्रकरणाची माहिती मिळताच खंडणी विरोधी पथकाने सापळा रचला. तक्रारदारांच्या सहकार्याने भारतीय चलनातील ५०० रुपयांच्या नोटांचे बंडल तयार करून आरोपीला देण्यात




आले. आरोपी खंडणीची रक्कम स्वीकारत असताना पोलिसांनी त्याला रंगेहात पकडले. आरोपीकडून ३ लाख रुपयांची खंडणीची रक्कम, एक चारचाकी वाहन व मोबाईल फोन असा एकूण ११ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी दिघी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त (गुन्हे) रोहिदास पवार यांच्या नेतृत्वाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक अमर राऊत, सुनिल कानगुडे, प्रदिप पोटे, प्रदीप गोडांबे, किशोर कांबळे, गणेश गिरीगोसावी, चंद्रकांत जाधव, किरण जाधव, संदिप गंगावणे, निलेश जाधव यांच्या पथकाने केली आहे.

## पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात सहाय्यक पोलीस आयुक्तांच्या नियुक्त्या; विविध विभागांत नव्याने जबाबदाऱ्या!

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील सहाय्यक पोलिस आयुक्तांच्या नियुक्त्यांमध्ये महत्त्वाचे फेरबदल करण्यात आले आहेत. पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या आदेशानुसार नव्याने बदलीवर व पदोन्नतीवर हजर झालेल्या अधिकाऱ्यांना तात्पुरत्या स्वरूपात विविध विभागांचा कार्यभार सोपविण्यात आला आहे. पुढील आदेशापर्यंत या नियुक्त्या लागू राहणार आहेत.

पोलिस आयुक्तालय मंजूर झाल्यानंतर प्रथमच शहरासाठी १० अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी ८ सहाय्यक आयुक्त संपूर्ण कारभार सांभाळत होते. आता ही संख्या वाढून १६ झाली आहे.

नव्या आदेशानुसार निलेश विश्वासराव देशमुख यांची वाहतूक




शाखेत, सुदर्शन साईदास राठोड यांची गुन्हे-१ शाखेत, प्रशांत बाबासो ढोले यांची पिंपरी विभागात, प्रिया देविदास ढमाळे यांची महाळुंगे विभागात, तर मनीषा विश्वंभर कदम यांची सांगवी विभागात सहाय्यक पोलिस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

पदोन्नतीवर हजर झालेले सुनील पांडुरंग पंधरकर यांच्याकडे विशेष शाखेची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच रोहिणी ज्ञानदेव बनकर यांची सायबर व आर्थिक गुन्हे शाखेत नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय, सचिन तुकाराम कदम यांची महाळुंगे विभागातून गुन्हे-२ शाखेत, प्रवीण बाळासाहेब मोरे यांची गुन्हे-२ मधून देहूरोड विभागात, तर विठ्ठल खंडुजी कुबडे यांची पिंपरी विभागातून हिंजवडी विभागात बदली करण्यात आली आहे.

संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी आपल्या नियुक्तीच्या ठिकाणी तातडीने हजर होऊन कार्यभार स्वीकारावा तसेच अनुपालन अहवाल सादर करावा, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## पक्षविरोधी भूमिका घेणाऱ्या नगरसेवकांवर कारवाई करणार; प्रशांत शितोळे यांचा इशारा

पिंपरी (दै. संध्या)

सर्वसाधारण सभेत पक्षाच्या विरोधात भूमिका घेतल्यास किंवा वक्तव्य केल्यास हयगय केली जाणार नाही. त्या नगरसेवकांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी मंगळवार (दि. ३०) पत्रकार परिषदेत दिला. मात्र, पक्षाची बदनामी रोखण्यासाठी ही कारवाई खरोखरच केली जाणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

भाजपाला लागणार शिस्त !; प्रदेश पदाधिकाऱ्यांनी टोचले कान; डागाळलेली प्रतिमा सुधारण्यासाठी कोअर कमिटी ठरविणार धोरण, असे ठळक वृत्त दैनिक पुढारीने मंगळवार (दि. ३०) प्रसिद्ध केले.

त्याची शहरातील राजकीय क्षेत्रात खूपच चर्चा झाली. सोशल मीडियावर ते वृत्त व्हायरल झाले.



त्याची दखल घेऊन सत्तारूढ पक्षनेते शितोळे यांनी मंगळवारी सायंकाळी तातडीने पत्रकार परिषद घेत, पक्षाची भूमिका सविस्तरपणे स्पष्ट केली.

प्रशांत शितोळे म्हणाले की, विविध कारणांमुळे पक्षाची प्रतिमा डागाळत आहे. ती प्रतिमा चांगली करण्यासाठी आमचे प्रयत्न असणार आहेत. कोअर कमिटीमध्ये ठरलेल्या पक्षाच्या भूमिकेनुसारच सर्वसाधारण सभेत नगरसेवकांना बोलावे लागणार आहे. पक्षविरोधी वक्तव्य केल्यास किंवा पक्षाची भूमिका मान्य न केल्यास त्या नगरसेवकांवर कठोर कारवाई केली जाईल.

पुनावळे येथील ९१ गुंठे जागा खासगी संस्थेला नाममात्र भाडे तत्वावर देण्याचा विषय त्या प्रभागातील भाजपाच्या चारही नगरसेवकांचा विरोध डावलून मंजूर करण्यात आला. त्या नगरसेवकांवर कारवाई करणार का, या प्रश्नावर प्रशांत शितोळे म्हणाले की, ती जागा १०० टक्के ताब्यात नाही.

त्याबाबत निविदा प्रक्रिया प्रशासकीय काळात पूर्ण करण्यात आली होती. त्या प्रभागातील नगरसेवकांनी प्रस्तावाबाबत उपयुक्त सूचना केल्या आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. पाणी टंचाई व इतर नागरी समस्या सभागृहात मांडल्यास कारवाई करणे, उचित ठरणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत स्थायी समितीची बैठक संपन्न विविध विकासकामांसह आरोग्य, शिक्षण यांसह विविध विषयांना मंजुरी!

## हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याणकारी राबविण्यात येणार-स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात संपन्न झाली. यावेळी विविध महत्वपूर्ण विषयांना स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी मंजुरी दिली.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने महानगरपालिकेस मंजूर झालेल्या ५ कोटी निधीतून मराठी शाळांच्या दर्जोन्नतीसाठी तसेच आरोग्य साहित्य, महिलांसाठी आरोग्यविषय साहित्य,पर्यावरण व पर्यटनासाठी निधी वापरण्यात येणार असल्याचे सभापती बारणे यांनी सांगितले. याशिवाय मंजूर करण्यात आलेल्या विविध विषयांमध्ये शहराची आरोग्य व्यवस्था बळकट करणे, दिव्यांग व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना संगणक शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे, कचरा व शौचालय व्यवस्थापन, तसेच अग्निशामक यंत्रणा सज्ज करणे यांसारख्या कामांचा समावेश आहे.

आज झालेल्या बैठकीस आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे,नगरसचिव मुकेश कोळप तसेच स्थायी समितीचे सदस्य आणि महापालिकेच्या



विविध विभागांचे प्रमुख व अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत रुग्णालयांसाठी आयुष्मान भारत व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत आवश्यक औषधे, उपभोग्य वस्तू आणि ऑर्थोपेडिक साहित्य खरेदीस मंजुरी. तसेच विविध प्रकारच्या औषधांची खरेदी करण्यास मंजूरी देण्यात आली.

औद्योगिक प्रशिक्षण विभाग मोरवाडी अंतर्गत MS-CIT उपकेंद्रांना मान्यता. याद्वारे महिला, अनुसूचित जाती/जमाती आणि भटक्या जमातीतील लाभार्थ्यांना १०% शुल्कात, तर ४०% पेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या लाभार्थ्यांना केवळ ५% शुल्कात संगणक प्रशिक्षणाची सुविधा मिळणार आहेत.

झोपडपट्टी भागातील सेवाशुल्क बिले वाटप आणि जनजागृतीचे काम महिला बचत गटांना देण्यात आले आहे, ज्यामुळे महिलांना रोजगार उपलब्ध होईल. तसेच, प्रभाग २० मधील सार्वजनिक शौचालयांच्या साफसफाईच्या कामाला मुदतवाढ देण्यात आली.

रावेत येथील एक्सप्रेस फिडरवर अखंड वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी स्वयंचलित यंत्रणा बसवणे, 'ब' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत जलनिःसारण (ड्रेनेज) कामे आणि सांगवी स्मशानभूमीतील गॅस शवदाहिनीची देखभाल दुरुस्ती या कामांना मंजुरी देण्यात आली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### विद्या प्रतिष्ठान कॉलेज विद्यानगरी बारामती येथील विद्यार्थ्यांना केले मार्गदर्शन

बारामती (दैनिक संध्या) : दिनांक 01/07/2026 रोजी दुपारी 12.30 वा. ते 02.00 वा.या वेळेत बारामती तालुका पोलीस स्टेशन हद्दीतील विद्या प्रतिष्ठान कॉलेज विद्यानगरी बारामती येथे "अंमली पदार्थ जनजागृती मोहीम" अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमामध्ये पोलिस निरीक्षक नारायण पवार यांनी विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांचे सेवन केल्याने होणारे शारीरिक,मानसिक, सामाजिक व आर्थिक दुष्परिणाम, त्यापासून होणारे नुकसान तसेच अमली पदार्थांपासून दूर राहण्याचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.तसेच अंमली पदार्थमुक्त समाज घडविण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतः जागरूक राहून इतरांमध्येही जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले.अंमली पदार्थांचे विक्री बाबत गोपनीय माहिती देणे बाबत शिक्षक विद्यार्थी व पालकांना आवाहन करण्यात आले.तसेच कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.उपस्थित विद्यार्थ्यांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सदर कार्यक्रमासाठी पोलीस निरीक्षक नारायण पवार,विद्या प्रतिष्ठान कॉलेजचे प्राचार्य भारत शिंदे,उपप्राचार्य अंकुश खोत, पोलीस उपनिरीक्षक शिंगाडे,पोलीस उपनिरीक्षक बगाडे,पोलीस अंमलदार वाकळे,महिला पोलीस अंमलदार पोतेकर,विद्या प्रतिष्ठान कॉलेज कडील ज्योती जगताप, अंकिता चौधर,नाझनीन खान,मुक्ता कडणे इत्यादी उपस्थित होते.



### वसुंधरा शिवाजी शितोळे-भोसले यांना पीएच.डी. प्रदान

बारामती (दैनिक संध्या) : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती येथील इंग्रजी विभागातील संशोधक - वसुंधरा शिवाजी शितोळे-भोसले यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी.पदवी जाहीर झाली आहे. वसुंधरा शितोळे-भोसले यांनी मानव्यविज्ञान शाखेच्या इंग्रजी विषयात 'Quest for Identity and Racial Discrimination in the Autobiographies of Maya Angelou : A Select Study' या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला.त्यांच्या या संशोधनासाठी विद्या प्रतिष्ठानच्या कमलनयन बजाज कॉलेज ऑफ इंजिनियरिंगच्या डॉ.अनिल पाटील यांनी मार्गदर्शन केले. पीएच.डी.पदवी प्राप्त केल्याबद्दल प्राचार्य डॉ.अविनाश जगताप, उपप्राचार्य डॉ.सचिन गाडेकर, डॉ.योगिनी मुळे,डॉ.अरुण मगर, इंग्रजी विभागप्रमुख डॉ.अजय ढवळे, केंद्र समन्वयक - डॉ.सुशिल देशमुख, प्रबंधक - अभिनंदन शहा, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.त्यांच्या या यशाबद्दल मित्रपरिवार आणि विद्यार्थ्यांनीही त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. डॉ.वसुंधरा शितोळे-भोसले यांच्या या उल्लेखनीय संशोधनामुळे इंग्रजी साहित्यविषयक समीक्षेत नव्या दृष्टिकोनाची भर पडली आहे.त्यांच्या पुढील शैक्षणिक आणि संशोधन कार्यासाठी त्यांना समाजातील विविध स्तरातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

### विकासकामांना प्राधान्य देऊ : विजयसिंह शिंदे

चाकण (दैनिक संध्या) : खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून लोकोपयोगी कामे केली जाणार असून, विकास कामांना प्राधान्य व गती देऊ, असे आश्वासन खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे यांनी दिले. खेड तालुक्यातील शेतकरी, व्यापारी, कष्टकरी हमाल, मापाडी बांधवांना चाकण बाजारपेठेत सर्व सोयी मिळाव्यात, यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती प्रयत्न करत आहे. बाजार समितीच्या माध्यमातून एकूण ८५ लाख ३२ हजार ०६३ रुपये खर्चाच्या विविध ऐतिहासिक विकासकामांचे भूमिपूजन व उदघाटन शिंदे पाटील यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी खेड पंचायत समितीच्या सभापती विद्या मोहिते, बाजार समितीचे सचिव बाळासाहेब धंद्रे, सहाय्यक सचिव संतोष गायकवाड, उल्हास चांभारे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.शिंदे पाटील यांच्या हस्ते यावेळी शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या अचूक वजनासाठी १०० मॅट्रिक टनी इलेक्ट्रॉनिक वजनकाटा (रु. २३,१४,२६५/-), बाजार आवारात येणाऱ्या सर्वांच्याच आरोग्यासाठी अद्ययावत स्वच्छतागृह (रु. ५३,०२,११८/-) या कामांचे भूमिपूजन, तसेच चालू बाजारभाव सर्वांना पारदर्शकपणे समोर दिसण्यासाठी भव्य एलईडी स्क्रीनचे (रु. ९,१५,६८०/-) उदघाटन करण्यात आले.

### भागू आढारी यांची ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या कार्यकारिणीवर वर्णी



चाकण (दैनिक संध्या) : गावच्या विकासाचा केंद्रबिंदू असलेल्या खेड तालुक्यातील बिरदवडी येथील ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी भागू भिवा आढारी यांची खेड तालुका ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या सदस्यपदी बिनविरोध निवड करण्यात आली. महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन शाखा खेड यांची पंचवार्षिक निवडणूक तसेच वार्षिक सर्वसाधारण सभा खेळमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी खेड तालुका ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे अध्यक्ष शंकर ढोरे व सचिव बाबाजी चव्हाण यांनी भागू भिवा आढारी यांची खेड तालुका ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या कार्यकारिणीवर सदस्यपदी निवड झाल्याची माहिती दिली. याप्रसंगी सुदाम कड, रवींद्र उगले, बाबाजी चव्हाण, प्रतिभा डोंगरे, काकासाहेब मिंड, शरद शिरसाठ, प्रमिला सुळके, अमोल भालेराव, प्रमोद बनसोडे, मधुकर डवणे, शरद ढोले, गोपीनाथ खोमणे, देवेंद्र नलावडे, भाऊसाहेब सानप आदी उपस्थित होते. बी.बी.आढारी यांनी सांगितले की," चाकण लगतच्या बिरदवडी येथे सध्या मी कार्यरत आहे. बिरदवडी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सर्वांना विश्वासात आणि बरोबर घेऊन रस्ते, सांडपाणी व्यवस्थापन, बंदिस्त गटर योजना मार्गी लावल्या आहेत. शाळा, अंगणवाडी व आवश्यक ठिकाणी पत्रा शेड उभारण्यात आले आहे. गावच्या विकासाला ग्रामस्थांचे चांगले सहकार्य मिळत आहे."

### कै. वसंतराव नाईक यांना अभिवादन

आळंदी (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी आळंदी नगरपरिषदेत त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. राज्यभर हा दिवस 'कृषी दिन' म्हणून उत्साहात साजरा केला जात असून, आळंदीतही नगरपरिषदेच्या वतीने कृषी क्षेत्रातील त्यांच्या ऐतिहासिक योगदानाचे स्मरण करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्षा सुजाताताई तापकीर, मुख्याधिकारी माधव खांडेकर, नगरसेवक रामचंद्र भोसले, सागर कुऱ्हाडे, संतोष रासकर, गोविंद कुऱ्हाडे, सुनिल घुंडरे तसेच नगरसेविका वैजयंता उमरगेकर, अरुणा घुंडरे, साक्षी कुऱ्हाडे, पूजा घुंडरे, ऋतुजा तापकीर, खुशी बोरुंदीया, अर्चना तापकीर आणि नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# अनिल मेहेर यांना मुक्त विद्यापीठाचा 'यश जीवनगौरव पुरस्कार'

**कृषी व ग्रामीण विकास क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल गौरव**



**नारायणगाव (दै. संध्या)**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक यांच्या वतीने ३७ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून ग्रामोन्नती मंडळ, नारायणगावचे कार्याध्यक्ष, कृषीरत्न अनिलतात्या मेहेर यांना कृषी व ग्रामीण विकास क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल " "यश जीवनगौरव पुरस्कार" नुकताच विद्यापीठाच्या प्रांगणात निवृत्त एअर चीफ मार्शल भूषण गोखले यांच्या शुभहस्ते समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.

या प्रसंगी वैद्यकीय सेवा क्षेत्रासाठी डॉ. अशोकराव कुकडे, लातूर, साहित्य संस्कृती व ग्राहक संरक्षण क्षेत्रासाठी प्रा. दिलीप फडके, नाशिक, आदिवासी उद्योजकता व पर्यावरण क्षेत्रासाठी डॉ. निरुपमा देशपांडे, मेळघाट, अमरावती तसेच महिला उद्योग सक्षमीकरण क्षेत्रासाठी सीमा कांबळे, पुणे आदी मान्यवरांनाही त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल" यश जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

१९८९ मध्ये स्थापन झालेल्या मुक्त विद्यापीठाने आज मोठी भरारी घेतली आहे. विद्यापीठाची ज्ञानगंगा संपूर्ण महाराष्ट्रभर घरोघरी पोहोचली आहे. अनेक छोट्या मोठ्या अभ्यासक्रमांच्या माध्यमातून अनेक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत. महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, कृषी, महिला सक्षमीकरण या क्षेत्रात मुक्त विद्यापीठाचे योगदान खूप मोठे आहे. असे गौरवोद्गार एअरचीफ मार्शल भूषण गोखले यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

अनिलतात्या मेहेर यांनी जुन्नर, नारायणगाव परिसरात शेतीचे अनेक प्रयोग करून शेतमालाला निर्यातक्षम बनवण्यामध्ये खूप काम केलेले आहे. द्राक्ष, केळी, ढोबळी मिरची या पिकांचे आधुनिक पद्धतीने उत्पादन वाढवण्यासाठी ते सतत प्रयत्नशील आहेत. तसेच जुन्नर तालुक्यातील हापूस आंब्याला' शिवनेरी' हापूस मानांकन अनिलतात्यामुळेच मिळालेले आहेत, असे कौतुकोद्गार विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी आपल्या प्रास्ताविकातून व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे, पुणे जिल्हा शिक्षण संस्थाचालक मंडळाचे अध्यक्ष विजय कोलते, उपाध्यक्ष गणपतराव बालवडकर, खजिनदार संग्राम कोंडे पाटील, सहसचिव डॉ. प्रसन्नकुमार देशमुख, ग्रामोन्नती मंडळाचे संचालक निलेश पाटे, ऋषिकेश मेहेर विविध विभागाचे प्राचार्य, शिक्षक आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ता पाटील यांनी केले. तर उपस्थितांचे आभार कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे यांनी मानले.

## हातभट्टी दारू निर्मितीवर छापा; अडीच हजार लिटर रसायन उध्वस्त

**चाकण (दै. संध्या)**

पिंपरी - चिंचवड गुन्हे शाखा युनिट - ३ आणि आळंदी पोलिसांनी अवैध दारू व्यवसायांविरोधात मोठी कारवाई करत चिंबळी गावच्या हद्दीतील इंद्रायणी नदीकाठी हातभट्टी दारू निर्मितीसाठी साठवून ठेवलेले तब्बल २,५०० लिटर रसायन नष्ट केले. पोलिसांनी या कारवाईत सुमारे १ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून संबंधितां विरुद्ध आळंदी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी (दि. २९ जून) पिंपरी - चिंचवड गुन्हे शाखा युनिट - ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष कसबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार श्रीधन डवके तसेच पोलीस शिपाई निखिल फापाळे आणि दिलीप राठोड हे आळंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. यावेळी हवालदार श्रीधन डवके आणि शिपाई निखिल फापाळे यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, चिंबळी गावातील भूमकर वस्ती परिसरात इंद्रायणी नदीच्या काठी झुडपात हातभट्टीची दारू तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात रसायन साठवून ठेवण्यात आले असल्याची माहिती मिळाली. तात्काळ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत छापा टाकला. तपासणी दरम्यान प्लास्टिकच्या ड्रममध्ये व इतर भांड्यांमध्ये भरून ठेवलेले सुमारे २,५०० लिटर रसायन आढळून आले. हे रसायन अवैध हातभट्टी दारू तयार करण्यासाठी वापरले जाणार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी ते घटनास्थळीच ओतून उध्वस्त केले.

## महिला सक्षमीकरणातील उल्लेखनीय कार्याची दखल

### शिरूरच्या राधिका घाटगे यांना 'लोकराजा राजर्षी शाहू गौरव राष्ट्रीय पुरस्कार'

**शिरूर (दै. संध्या)**

महिला सक्षमीकरण, बचत गटांना मार्गदर्शन, ग्रामीण उद्योजकता आणि शासकीय योजनांचा लाभ महिलांपर्यंत पोहोचविण्याच्या उल्लेखनीय कार्याबद्दल शिरूर येथील कृषीका ॲग्रो संजीवनी बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा राधिका रुपेश घाटगे यांना नुकताच 'लोकराजा राजर्षी शाहू गौरव राष्ट्रीय पुरस्कार – २०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.




कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते त्यांना ट्रॉफी, राजर्षी शाहू महाराजांची प्रतिमा आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी राष्ट्रीय महासचिव श्रीमती सुनीलता केदार, दत्तात्रय सूर्यवंशी, भारत माळी, एन. डी. मगदूत, शशिकांत म्हेतर, पत्रकार कुऱ्हाडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

राधिका घाटगे यांच्या नेतृत्वाखाली २०२४ पासून कार्यरत असलेली कृषीका ॲग्रो संजीवनी बहुउद्देशीय संस्था महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबवत आहे. संस्थेमार्फत महिलांना शासकीय योजनांची माहिती, व्यवसाय प्रशिक्षण, बचत गटांना मार्गदर्शन, गृहउद्योगासाठी आवश्यक यंत्रसामग्री, उत्पादने विक्रीची संधी तसेच घरबसल्या उत्पन्नाचे विविध मार्ग उपलब्ध करून दिले जातात.

संस्थेच्या माध्यमातून हजारो महिला सभासद जोडल्या गेल्या असून अनेक महिला वाळवण, पापड, लोणची, नैसर्गिक पिठे, मसाले व इतर घरगुती उत्पादनांच्या व्यवसायातून स्वावलंबी झाल्या आहेत. तसेच शिलाई मशीन, पीठ गिरणी, सोलर फवारणी पंप, शिक्षण व आरोग्याशी संबंधित विविध शासकीय योजनांचा लाभही महिलांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे.

यापूर्वीही राधिका घाटगे व त्यांच्या संस्थेला भारतीय कृषक समाज, नवी दिल्ली, भारतीय कृषी विद्यापीठ राहुरी, कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव, महाराष्ट्र गौरव राज्यस्तरीय पुरस्कार तसेच अविष्कार फाउंडेशन, सोलापूर यांसह विविध संस्थांकडून सन्मानित करण्यात आले आहे. 'लोकराजा राजर्षी शाहू गौरव राष्ट्रीय पुरस्कार' हा त्यांच्या सामाजिक व महिला विकासाच्या कार्याला मिळालेला आणखी एक मानाचा सन्मान मानला जात आहे.




## रोटरीच्यावतीने डॉक्टर्स डे सीए डे उत्साहात संपन्न

**जुन्नर (दै. संध्या)**

रोटरी क्लब नारायणगावच्या वतीने डॉक्टर्स डे व सीए डे उत्साहात साजरा करण्यात आल्याची माहिती रोटरी क्लब नारायणगावचे नूतन अध्यक्ष अमितशेठ बेनके यांनी दिली. याप्रसंगी सीए अमीर तांबोळी,भंडारी तसेच सर्व डॉक्टर यांचा सन्मानचिन्ह व गुलाबपुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

रोटरी क्लब नारायणगावचे नूतन अध्यक्ष रो.अमित बेनके,डॉ आनंद कुलकर्णी,सर्पदंश तज्ञ डॉ.सदानंद राऊत,JTMPA चे अध्यक्ष रो.डॉ.प्रशांत काचळे,सीए अमीर तांबोळी यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. यावेळी ज्येष्ठ रो.डॉ.आनंद कुलकर्णी,डॉ.सीमा कुलकर्णी,रो.डॉ.योगेश पाटील,डॉ. संदीप डोळे,डॉ.समीर फुलवडे,डॉ. अमेय डोके,डॉ.अजय मते तसेच नारायणगावातील मान्यवर डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला.

रोटरी क्लब नारायणगावच्या वतीने फर्स्ट लेडी धनश्री बेनके, रो.डॉ.केतकी काचळे,डॉ.सीमा जाधव,रो.अनिता शिंदे,रो. अरविंद ब्रम्हे,रो.सचिन घोडेकर,रो.मंगेश मेहेर,रो.हेमंत महाजन,रो.तेजस वाजगे,रो प्रशांत ब्रह्मे,रो.प्रसाद बांगर, रो.भरत चिलप,रो.दिपक पटेल, रो.विवेक नाईक,रो.वैभव बेनके, दिलदिप बांगा व क्लबचे सर्व मान्यवर सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोटरी क्लब नारायणगावचे माजी अध्यक्ष रो.स्वप्निल जुन्नरकर यांनी केले तर रो.डॉ.प्रशांत काचळे यांनी आभार मानले.

## गाथा पूजनाने आषाढी वारी पालखी सोहळा सप्ताहास प्रारंभ

**आळंदी (दै. संध्या)**

श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या आषाढी वारी पालखी सोहळ्यानिमित्त आयोजित सप्ताहास गाथा पूजनाने उत्साहपूर्ण प्रारंभ झाला. पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप यांच्या हस्ते गाथा पूजन करण्यात आले. यावेळी विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील, पालखी सोहळा मालक ऋषिकेश पवार, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, मानकरी योगरीज कुऱ्हाडे, मंगेश आरू, वेदमूर्ती निखिल प्रसादे, राजाभाऊ चौधरी आदी उपस्थित होते. सप्ताहादरम्यान दररोज सकाळी गाथा भजन, दुपारी प्रवचन आणि सायंकाळी कीर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रवचन



सेवेसाठी प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, विश्वस्त योगी निरंजनाथजी, पुरुषोत्तम महाराज पाटील, दत्तात्रय माशरे, भागवत महाराज साळुंखे आणि अशोक महाराज इदगे यांची सेवा होणार आहे. सायंकाळी देहूकर फड, साधक आश्रम, सिद्धबेट शिक्षण संस्था, हराळे वैष्णव, वाल्हूरकर तसेच भाईजी भोगवलगावकर यांच्या वतीने कीर्तन सेवा संपन्न होणार असल्याची माहिती व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांनी दिली.

## जुनी जेजुरीतील बल्लाळेश्वर कुंड स्वच्छतेच्या प्रतीक्षेत



**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरीनगरीतील जुनी जेजुरी येथील ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व असलेल्या बल्लाळेश्वर मंदिराच्या कुंडात दुर्गंधीयुक्त पाणी साठल्याने येथे येणाऱ्या भाविकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तिथक्षेत्र जेजुरी नगरीतील खंडोबा मंदिराच्या पूर्वेकडे ऐतिहासिक काळात सुमारे 36 एकर जागेत भव्य पेशवे तलाव बांधण्यात आला. या तलावाच्या पूर्वे बाजूला अतिशय सुंदर दगडी बांधकाम असलेले बल्लाळेश्वराचे मंदिर आहे. या मंदिराच्या कुंडात या तलावाचे पाणी गोमुखातून पडते. सध्या हे पाणी अतिशय दूषित झाले असून या पाण्याला दुर्गंधी सुटली आहे. या मंदिरात दररोज मोठ्या प्रमाणात भाविक येतात .या दूषित पाण्याचा त्रास भाविकांना होतो. बल्लाळेश्वर कुंड हे जेजुरीच्या ऐतिहासिक व धार्मिक वारसा असणारा एक महत्त्वाचा भाग असून, त्याबाबत स्थानिक नागरिक व भाविकांकडून वेळोवेळी माहिती व सूचना प्रशासनापर्यंत पोहोचविल्या जात आहेत. प्रशासनानेही याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.

## शेतीला जोड व्यवसाय म्हणून रेशीम उद्योगकडे लक्ष द्यायला पाहिजे : केसलकर

**राजगुरुनगर (दै. संध्या)**

हवामानातील बदल, नैसर्गिक आपत्ती आणि शेतीमालाच्या बाजारभावातील सातत्याने होणाऱ्या चढ-उतारामुळे शेती व्यवसाय अधिक जोखमीचा बनत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीला शाश्वत उत्पन्नाचा आधार मिळावा यासाठी इतर जोड व्यवसायांसह रेशीम उद्योगाकडेही वळण्याची गरज असल्याचे प्रतिपादन रेशीम संचालनालय, पुणे येथील केसलकर यांनी केले. शेतकऱ्याच्या हितासाठी शेती क्षेत्रात आमूलाग्र बदल करणारे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्ताने पंचायत समितीच्या राजा शिवछत्रपती सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कृषी दिन कार्यक्रमानिमित्त तालुका कृषी अधिकारी व पंचायत समिती कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजगुरुनगर येथे कृषी दिन साजरा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर पंचायत समितीच्या सभापती विद्याताई मोहिते,उपसभापती मंगेश सावंत सहाय्यक गटविकास अधिकारी सुनील भोईर,तालुका कृषी अधिकारी वैभव विश्वे,पंचायत समिती सदस्य दिलीप डुबे,रूपाली कांबळे,कविता राक्षे, सहाय्यक कृषी अधिकारी किरण कानडे, के.व्ही.के प्रमुख डॉ.प्रशांत शेटे, शास्त्रज्ञ, कांदा लसूण केंद्राचे शैलेंद्र घाडगे,पर्यावरण रक्षक फाउंडेशनचे रणजीत घोळवे,कृषी अधिकारी विजय खेडेकर, केसलकर साहेब,रेशीम संचनालय अतुल कुऱ्हाडे,अनुप सोनी, कृषी कन्या,महिला कृषी गट,खेड,चाकण, पाईट,वाडा मंडळ कृषी अधिकारी,व सर्व ग्रामविकास अधिकारी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी कृषी क्षेत्रातील तज्ञ मान्यवरांनी उपस्थितांना शेतीविषयी माहिती विषद केली. यावेळी केसलकर पुढे बोलताना म्हणाले रेशीम उद्योग हा कमी क्षेत्रात अधिक उत्पन्न देणारा आणि ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती करणारा व्यवसाय आहे. तुती लागवड, रेशीम अळी संगोपन तसेच कोष उत्पादनाच्या माध्यमातून शेतकरी नियमित उत्पन्न मिळवू शकतात.




मागणी खूप असून ,कोश बाजारही कधी पडत नाही.उद्योजक स्वतः येऊन खरेदी करतात. शासनाकडून रेशीम उद्योगासाठी विविध अनुदान योजना, तांत्रिक मार्गदर्शन आणि प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जात आहे.

इच्छुक शेतकऱ्यांनी या योजनांचा लाभ घेऊन रेशीम उद्योग स्वीकारावा, असे आवाहनही केसलकर यांनी केले.या दरम्यान शास्त्रज्ञ, कांदा लसूण केंद्राचे शैलेंद्र घाडगे,यांनी कांदा पीक बाबत बोलताना देशात ३५ टक्के कांद्याचे उत्पादन महाराष्ट्र राज्य उपलब्ध करून देत आहे. तर पुरंदर येथील पर्यावरण रक्षक फाउंडेशनचे रणजीत घोळवे यांनी बांबू शेती बाबत बोलताना म्हणाले बांबू शेती ही ऑक्सिजन देणारे , फास्ट वनस्पती असून अतिवृष्टी,गारपीठ,दुष्काळाचा यावर परिणाम होत नसून भारतापेक्षा चीन या शेतीकडे अधिक लक्ष दिले जाते.डॉ.प्रशांत शेटे यांनी पावसाचे प्रमाण कमी अधिक प्रमाणात होत असल्याने आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून शेती करणे काळाची गरज असल्याचे विषद केलं.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

# मुंद्रा बंदराच्या अत्याधुनिक व्यवस्थापनाचा महाराष्ट्राच्या बंदर विकासासाठी उपयोग होणार : मंत्री नितेश राणे

## मुंद्रा पोर्टची पाहणी व महाराष्ट्रातील बंदरे विकासाबाबत चर्चा

■ मुंबई (दै. संध्या)

मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी देशातील सर्वात मोठ्या आणि अत्याधुनिक व्यावसायिक बंदरांपैकी एक असलेल्या गुजरातमधील मुंद्रा पोर्टला भेट देऊन तेथील जागतिक दर्जाच्या सुविधा, आधुनिक बंदर व्यवस्थापन आणि पायाभूत विकासकामांची पाहणी करुन माहिती घेतली. महाराष्ट्रातील बंदरांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांना अधिक सक्षम, स्पर्धात्मक व आधुनिक बनविण्यासाठी मुंद्रा बंदराच्या अत्याधुनिक व्यवस्थापनाचा महाराष्ट्राच्या बंदर विकासासाठी उपयोग होणार असल्याचे बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.

या दौऱ्यात मंत्री नितेश राणे यांनी बंदरातील अत्याधुनिक कंटेनर हाताळणी व्यवस्था, यांत्रिकीकरण, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, मालवाहतूक व्यवस्थापन, लॉजिस्टिक्स नेटवर्क, साठवण सुविधा, जहाजांच्या जलद हालचालीसाठी विकसित करण्यात आलेली यंत्रणा तसेच विविध पायाभूत विकास प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी केली. बंदरातील कार्यक्षम नियोजन, वेगवान सेवा आणि तंत्रज्ञानाधारित व्यवस्थापनामुळे मुंद्रा पोर्टने देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे त्यांनी नमूद केले.


या भेटीदरम्यान अदानी पोर्ट्सचे व्यवस्थापकीय संचालक करण गौतम अदानी उपस्थित होते. त्यांच्यासमवेत बंदर विकास, सागरी वाहतूक, जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, खासगी गुंतवणुकीच्या संधी तसेच भारताच्या आर्थिक प्रगतीमध्ये बंदर क्षेत्राची वाढती भूमिका यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी महाराष्ट्रातील बंदरे अधिक सक्षम, कार्यक्षम आणि जागतिक दर्जाची करण्यासाठी आवश्यक तांत्रिक उपाययोजना, आधुनिक उपकरणांचा वापर, लॉजिस्टिक्स साखळी बळकट करणे, मालवाहतुकीची क्षमता वाढविणे आणि बंदरांशी संलग्न औद्योगिक विकासाला चालना देण्याच्या विविध बाबींवरही विचारविनिमय झाला.

बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले की, महाराष्ट्राला लाभलेला विस्तीर्ण समुद्रकिनारा आणि बंदरांची क्षमता लक्षात घेता राज्यातील बंदरांचा आधुनिक पद्धतीने विकास करणे ही शासनाची प्राथमिकता आहे. देशातील आणि जगातील यशस्वी बंदरांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करून त्यातील सर्वोत्तम पद्धती महाराष्ट्रात राबविण्यात येतील. यामुळे राज्यातील सागरी व्यापाराला गती मिळेल, गुंतवणूक वाढेल, रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल.



मुंद्रा पोर्टच्या अभ्यास दौऱ्यामुळे महाराष्ट्रातील बंदर विकासासाठी नवीन दिशा मिळणार असून, आधुनिक तंत्रज्ञान, कार्यक्षम व्यवस्थापन आणि जागतिक दर्जाच्या सुविधा यांच्या माध्यमातून राज्यातील बंदरांना अधिक स्पर्धात्मक बनविण्याच्या दृष्टीने हा दौरा महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास मंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केला.



## मणदूर प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांवर सांगली जिल्हाधिकारी यांनी बैठक घ्यावी – जलसंपदा मंत्री

■ मुंबई (दै. संध्या)

सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील मणदूर येथील वारणा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत जिल्हाधिकारी, सांगली यांनी सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसह लवकरात लवकर बैठक घेऊन मार्ग काढावा, असे निर्देश जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

मंत्रालयात झालेल्या बैठकीस आमदार सत्यजित देशमुख, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, प्रभारी मुख्य अभियंता अलका अहिरराव तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. वारणा प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या पुनर्वसन, जमीन, मूलभूत सुविधा आणि इतर प्रलंबित प्रश्न संवेदनशीलतेने हाताळावेत. तसेच आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया गतीने पूर्ण करून प्रश्नांच्या सोडवणुकीस प्राधान्य द्यावे, असे निर्देश विखे-पाटील यांनी दिले.

आमदार सत्यजित देशमुख यांनी मणदूर परिसरातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या अडचणींची सविस्तर माहिती दिली.

## वाडी नगरपरिषदेच्या सांडपाण्याचा प्रश्न ३० ऑगस्टपर्यंत मार्गी लावणार – पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे

■ मुंबई (दै. संध्या)

नागपूर जिल्ह्यातील वाडी नगरपरिषदेच्या हद्दीतील अंबाझरी तलावात प्रक्रिया न केलेले सांडपाणी सोडले जात असल्याच्या प्रश्नावर राज्य शासनाने ठोस उपाययोजना हाती घेतल्या असून, ११ एमएलडी क्षमतेचा सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प (एसटीपी) ३० ऑगस्ट २०२६ पर्यंत कार्यान्वित होईल. त्यानंतर प्रक्रिया केलेले पाणीच तलावात सोडण्यात येईल, अशी माहिती पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी विधान परिषदेत दिली.

विधान परिषदेत सदस्य परिणय फुके यांनी यासंदर्भात उपस्थित केलेल्या लक्ष्यवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री पंकजा मुंडे बोलत होत्या. या लक्षवेधीच्या चर्चेत सदस्य संजय भेंडे, अभिजित वंजारी यांनी सहभाग घेतला.



पर्यावरण मंत्री मुंडे म्हणाल्या की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे (एमपीसीबी) प्रमुख काम प्रदूषण रोखण्यासाठी संबंधित संस्थांना नोटिसा देणे व पर्यावरणीय नियमांची अंमलबजावणी करणे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी उपलब्ध करून देण्याचा अधिकार मंडळाकडे नाहीत. त्यामुळे नगरपालिकांनी आवश्यक पायाभूत सुविधा उभारणे ही त्यांची जबाबदारी आहे.

वाडी नगरपरिषदेच्या ११ एमएलडी क्षमतेच्या एसटीपीचे सुमारे ८६ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम ३० ऑगस्टपर्यंत पूर्ण होईल. हा प्रकल्प सुरू झाल्यानंतर सांडपाण्यावर प्रक्रिया करूनच ते तलावात सोडले जाईल. त्यामुळे तलावातील प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण मिळेल, असा विश्वास मंत्री मुंडे यांनी व्यक्त केला.

तलावातील जलपर्णीच्या समस्येचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, घरगुती सांडपाण्यातील फॉस्फेटमुळे जलपर्णी वाढते. सांडपाणी प्रक्रिया व्यवस्था सुरू झाल्यानंतर या समस्येवरही मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळण्यास मदत होईल. पर्यावरण विभागाच्या विविध योजनांसाठी आवश्यक निधीची मागणी शासनाकडे करण्यात येणार आहे. नदी पुनरुज्जीवन, तलाव संवर्धन आणि प्रदूषण नियंत्रणासाठी स्वतंत्र आराखडा तयार करण्यात आला असून, उपलब्ध निधीनुसार ही कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येतील.

हिंगणा एमआयडीसी तलावातील पाणी प्रक्रिया करून उद्योगांना पुरवत असल्याची माहिती देत त्यांनी सांगितले की, सध्या येणारे पाणी अत्यंत प्रदूषित असल्याने त्यावर प्रक्रिया करण्यासाठी अतिरिक्त प्रयत्न करावे लागत आहेत. त्यामुळे नगरपरिषदांची स्वतःची सांडपाणी प्रक्रिया व्यवस्था सक्षम होणे अत्यावश्यक आहे.

प्रदूषण नियंत्रण ही केवळ एका विभागाची जबाबदारी नसून नगरविकास विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, उद्योग विभाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नागपूरसह राज्यातील नद्या, तलाव आणि अन्य जलस्रोतांचे प्रदूषण रोखण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

## गोदावरी नदीकाठच्या पूरप्रवण गावांच्या पुनर्वसनासाठी सुधारित प्रस्ताव सादर करा - मंत्री मकरंद जाधव-पाटील

■ मुंबई (दै. संध्या)

गोदावरी नदीकाठच्या पूरप्रवण गावांतील नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाच्या धोरणानुसार आवश्यक प्रस्ताव तातडीने तयार करून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत शासनाकडे सादर करावेत, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले.

गोदावरी नदीकाठच्या पूरप्रवण गावांच्या पुनर्वसनासंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस विधानसभा सदस्य विजयसिंह पंडित, हिकमत उढाण, राजेश विटेकर, विभागीय आयुक्त, तसेच बीड, परभणी आणि जालना जिल्हा अधिकारी, जिल्हा पुनर्वसन अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

बैठकीत बीड, परभणी आणि जालना जिल्ह्यातील गोदावरी नदीकाठच्या पूरप्रवण गावांचा आढावा घेण्यात आला. यामध्ये बीड जिल्ह्यातील ६४, परभणी जिल्ह्यातील ५१ आणि जालना जिल्ह्यातील ३४ अशा एकूण १४९ गावांबाबत सविस्तर माहिती सादर करण्यात आली. या गावांमध्ये १९९२, २००६ आणि २०२५ मध्ये आलेल्या पुरामुळे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करावे लागल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.



मंत्री जाधव-पाटील म्हणाले की, वारंवार पूरग्रस्त होणाऱ्या गावांच्या पुनर्वसनाबाबत कोणताही विलंब होऊ नये. ज्या गावांचे पूर्ण किंवा अंशतः पुनर्वसन आवश्यक आहे, त्या गावांचे प्रस्ताव शासनाच्या निर्धारित निकषांनुसार तयार करावेत. तसेच ज्या ठिकाणी संरक्षण भिंती, बंधारे किंवा इतर पूरप्रतिबंधक उपाययोजना आवश्यक आहेत, त्या उपाययोजनांचेही स्वतंत्र प्रस्ताव सादर करावेत. बैठकीत पूरप्रवण गावांसाठी ब्ल्यू लाईन, रेड लाईन निश्चित करण्याच्या कामाला प्राधान्य देण्याचे निर्देशही देण्यात आले. पुनर्वसनाचे प्रस्ताव तज्ज्ञ समितीसमोर सादर करण्यासाठी ही प्रक्रिया आहे. सर्वेक्षण, आवश्यक कागदपत्रे आणि तांत्रिक बाबींची पूर्तता करावी. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत पुनर्वसनाची प्रक्रिया पारदर्शक आणि गतिमान पद्धतीने राबविण्यात यावी, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीत राज्य शासनाच्या पुनर्वसन धोरणानुसार आपत्तीप्रवण गावांचे प्रस्ताव जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत शासनाकडे सादर करण्यात येतील. त्यानंतर मदत व पुनर्वसन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमिती तसेच तज्ज्ञ समितीच्या शिफारशीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

## समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन पद्म पुरस्कारांसाठी परिपूर्ण प्रस्ताव सादर करा – जयकुमार रावल

■ मुंबई (दै. संध्या)

पद्म पुरस्कार २०२७ साठी पात्र व्यक्तींची निवड करताना जिल्हाधिकाऱ्यांनी केवळ प्राप्त अर्जांवर अवलंबून न राहता जिल्ह्यातील विविध क्षेत्रांत समर्पित भावनेने उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा शोध घ्यावा. तसेच पद्म पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष कक्ष तयार करून ऑनलाईन अर्ज भरण्याची व परिपूर्ण प्रस्ताव तयार करण्याची व्यवस्था करावी, असे निर्देश राजशिष्टाचार मंत्री तथा पद्मपुरस्कार शिफारस समितीचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी दिले.



विधानभवनमध्ये आयोजित पद्म पुरस्कार २०२७ संदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांसोबतच्या ऑनलाइन बैठकीत समितीचे अध्यक्ष तथा राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल बोलत होते. यावेळी समितीचे सदस्य तथा उद्योग मंत्री उदय सामंत, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, राजशिष्टाचार विभागाचे सचिव राजेश गवांदे आदी उपस्थित होते.

राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, पद्म पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याची ३१ जुलै ही अंतिम मुदत असली तरी जिल्हास्तरीय समित्यांनी १५ जुलैपर्यंत शिफारस केलेली नावे राज्य समितीकडे पाठवावीत. अर्जांची संख्या वाढविण्यापेक्षा गुणवत्तापूर्ण आणि देशपातळीवर उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचीच नावे पाठवावीत. जिल्हाधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था आणि विविध क्षेत्रातील जाणकारांशी चर्चा करून योग्य व्यक्तींची निवड करावी. पद्म पुरस्कारांसाठी शिफारस करताना संबंधित व्यक्तीचे अत्युत्कृष्ट कार्य हा प्रमुख निकष असावा आणि त्या कार्यामध्ये समाजसेवेचाही समावेश असावा. तसेच संबंधित व्यक्तीला यापूर्वी प्राप्त झालेले राष्ट्रीय अथवा राज्यस्तरीय पुरस्कार विचारात घ्यावेत, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, महिला, दिव्यांग तसेच दुर्बल घटकांतील गुणवंत व्यक्तींनाही पद्म पुरस्कारांसाठी प्राधान्याने संधी मिळावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### डाव्या कालव्याची कामे त्वरित करा – विखे पाटील

मुंबई (दैनिक संध्या) : दूधगंगा प्रकल्पांतर्गत डाव्या कालव्याची कामे त्वरित करावीत असे निर्देश जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीस वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, प्रभारी मुख्य अभियंता अलका अहिरराव यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. दूधगंगा डावा कालवा अस्तरीकरणाच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे. जयसिंगराव तलाव प्रश्नी जलसंपदा विभागाने योग्य नियोजन करून कार्यवाही करावी असे निर्देशही त्यांनी दिले. कागल नगर परिषदेने पाझर तलाव येथे पर्यटन विषयक चांगल्या सुविधा निर्माण केल्या आहेत. या ठिकाणी आवश्यक कामे करण्यासाठी कार्यकारी अभियंता यांच्याकडून नाहरकत घ्यावी असे निर्देश देण्यात आले.

### स्वच्छ, सुंदर भारतासाठी नागरिकांनी पुढे यावे

मुंबई (दैनिक संध्या) : 'स्वच्छता पखवाड़ा २०२६' हा उपक्रम या वर्षी १ जुलैपासून राबवण्यात येत आहे. स्वच्छता ही सामूहिक जबाबदारी आहे. 'स्वच्छता' सर्व घटकांतील लोकांना एकत्र आणणारी ही मोहीम आहे. भारत पेट्रोलियमतर्फे स्वच्छता, कचरा वर्गीकरण आणि कचरामुक्त भारताचे महत्त्व शाळांमध्ये समजावे, यासाठी निबंध आणि चित्रकला स्पर्धा, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता रॅली, प्रतिज्ञा व विविध कार्यक्रम राबवण्यात येत आहेत, असे तेल उद्योग राज्यस्तरीय समन्वयक मिहिर जोशी यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे भारत पेट्रोलियम आणि भारतीय रेल्वे विभागाच्या वतीने स्वच्छता हा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास रेल्वेचे अधिकारी वरिष्ठ डीसीएम प्रकाश कनोजिया, स्टेशन प्रबंधक पी. डी. परब, इन्स्पेक्टर इन्चार्ज, भारत पेट्रोलियमचे मुख्य प्रबंधक दिपक वाघ, उप महाप्रबंधक अमित सोनकुसरे, वरिष्ठ प्रबंधक रितेश जाधव उपस्थित होते. मिहीर जोशी म्हणाले की, स्वच्छता उत्सव या मोहिमेच्या अंतर्गत नुक्कडनाटक च्या माध्यमातून जनजागृती व स्वच्छतेचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच सफाई मित्र यांचाही सन्मान या कार्यक्रमात केला गेला. स्वच्छ व सुंदर भारत देश साकारण्यासाठी प्रत्येक नागरिकाचे योगदान असणे आवश्यक आहे, असे आवाहन त्यांनी केले.

### राज्यपालांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय कृषी सन्मान

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या उपस्थितीत २०२३ व २०२४ या वर्षांमधील डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण यांसह विविध कृषी पुरस्कार वितरण व सन्मान सोहळा संपन्न झाला. यावेळी १८९ शेतकरी, संस्था व गटांना राज्यपालांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. राज्यपालांच्या हस्ते क्षेत्रीय स्तरावरील सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात लॅपटॉप वितरित करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, कृषीराज्य मंत्री आशिष जयस्वाल, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, कृषी सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सुरज मांढरे आदी या कृषी सन्मान सोहळ्याला उपस्थित होते.



## थोडक्यात पण महत्वाचे...



### शरदचंद्र पवार कॉलेजच्या 15 विद्यार्थ्यांची ल्युपिनमध्ये निवड

नारायणगाव (दैनिक संध्या) : श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाच्या ओतूर येथील शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी कॅम्पस प्लेसमेंटमध्ये मोठी कामगिरी केली आहे. नामांकित ल्युपिन फार्मास्युटिकल कंपनीने आयोजित केलेल्या पूल कॅम्पस ड्राईव्हमध्ये या महाविद्यालयातील एकूण १५ विद्यार्थ्यांची यशस्वी निवड झाली आहे. या यशाने महाविद्यालयाच्या कौतुकाचा मानाचा तुरा रोवला असून, ओतूर येथील फार्मसी कॉलेजने प्लेसमेंटमध्ये नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. या कॅम्पस ड्राईव्हमध्ये पुणे, लातूर, धाराशिव, नाशिक आणि अहिल्यानगर येथील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. ल्युपिन कंपनीच्या संभाजीनगर येथील मानव संसाधन (एच आर) आणि तांत्रिक विभागातील अधिकाऱ्यांनी उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. अतिशय कठोर आणि बहुपदरी निवड प्रक्रियेनंतर १५ गुणवंत विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली. हे सर्व विद्यार्थी लवकरच ल्युपिन कंपनीत आपल्या व्यावसायिक कारकिर्दीची सुरुवात करणार आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विशाल तांबे, मानद सचिव वैभव तांबे आणि संचालिका नीलम तांबे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले व त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश दामा यांच्या मार्गदर्शनाखाली हा कॅम्पस ड्राईव्ह यशस्वी पार पाडण्यासाठी अकॅडमिक कोऑर्डिनेटर डॉ. सुमित जोशी, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. वैशाली अडसरे, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### वटपौर्णिमेच्या निमित्ताने वृक्षारोपणाचा प्रेरणादायी उपक्रम



नारायणगाव (दैनिक संध्या) : सोमवारी मांजरवाडी येथील बिरोबा मंदिर ऑक्सिजन पार्क येथे मांजरवाडी ग्रामपंचायतच्या वतीने वटपौर्णिमेच्या औचित्य साधून समस्त महिला व ग्रामस्थांच्या सहभागातून वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या पर्यावरण पूरक उपक्रमासाठी जिल्हा परिषद सदस्या सौ. नेहा बाबू पाटे ,कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य माऊलीशेठ खंडागळे, मांजरवाडीच्या सरपंच सारिका ताई गायकवाड, उपसरपंच संतोष भाऊ मोरे ,माजी उपसभापती रमेशभाऊ खुडे, तंटामुक्ती अध्यक्ष किरण थोरात, सुरेशभाऊ मुळे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी "एक झाड लावूया... पर्यावरण वाचवूया!" असा संदेश देण्यात आला.



### ओतूर पोलिस अधिकाऱ्यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

नारायणगाव (दैनिक संध्या) : ओतूर पोलीस स्टेशन हद्दीतील धोलवड येथील शिवनेरी विद्यालयाला ओतूर पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी भेट दिली. सदर वेळी विद्यार्थी यांना सायबर गुन्ह्याबाबत माहिती दिली. मोबाईलचा वापर कमी करणे, पोस्को गुन्हा या बाबत विद्यार्थी विद्यार्थीनी यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. तसेच मा. संदिप सिंह गिल सॉ पोलीस अधीक्षक यांच्या संकल्पनेतुन पोलीस काका म्हणून, तेथील विद्यार्थी यांना पोलीस हवालदार साबळे यांचा मोबाईल नंबर देऊन काही अडचण आल्यास त्यांना संपर्क करण्याबाबत माहिती दिली. सदर कामगिरी सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार साबळे, भालेकर, केदार यांनी केली आहे.

# आषाढी वारीच्या तयारीची उच्चस्तरीय पाहणी

## जर्मन हँगर, मोबाईल टॉयलेटसह वारकरी सुविधांच्या कामांना गती

आळंदी (दै. संध्या)

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आळंदी येथून प्रस्थान करणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी लाखो वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुणे जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले आहे. या नियोजनाची प्रत्यक्ष पडताळणी करण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या नेतृत्वाखाली आळंदीत पालखी मार्गाची उच्चस्तरीय पाहणी करण्यात आली. यावेळी आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांच्या निवास व स्वच्छतेच्या सुविधांसाठी आळंदी येथे उभारण्यात येत असलेल्या जर्मन हँगर तसेच मोबाईल टॉयलेट उभारणीच्या कामांचीही मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. सुरू असलेल्या कामांची गुणवत्ता, गती आणि वारकऱ्यांना उपलब्ध होणाऱ्या सुविधांचा त्यांनी आढावा घेतला. ही कामे निर्धारित मुदतीत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या.

पाहणी दौऱ्यात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भूषण जोशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाथरवटकर,



नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, आळंदी नगरपरिषदांचे मुख्याधिकारी, हवेली व खेड पंचायत समितीचे पदाधिकारी, दोन्ही तालुक्यांचे गटविकास अधिकारी, हवेली पंचायत समितीचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.सुरेश गोरे, खेड पंचायत समितीचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.विलास माने तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पाहणीदरम्यान पालखी मार्गावरील विहिरी, बोअरवेल व पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची स्वच्छता आणि क्लोरीनेशन, हॉटेल व भोजनालयांमधील अन्नसुरक्षा, परिसर स्वच्छता, धूर फवारणी, डास नियंत्रण उपाययोजना तसेच संसर्गजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी करण्यात आलेल्या उपायांचा आढावा घेण्यात आला.

## रांगोळीतून उलगडले धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य

पुणे (दै. संध्या)

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विविध सामाजिक आणि जनजागृतीपर उपक्रमांनी पुणेकरांचे लक्ष वेधून घेतले. धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समिती, पुणे आणि जनहित चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रांगोळी प्रदर्शन,आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर तसेच विविध सामाजिक उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनातील विविध पैलू उलगडणाऱ्या आकर्षक रांगोळ्यांनी प्रदर्शनाचे प्रमुख आकर्षण ठरले. सिंहाशी झुंज देतानाचा प्रसंग,बंदिवासातील प्रसंग,मराठ्यांच्या सागरी सामर्थ्याचे दर्शन, छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांची एकत्रित





### सामाजिक उपक्रमांनी उत्सवाला दिली नवी दिशा

रांगोळी तसेच राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्यातील वात्सल्यपूर्ण नात्याचे चित्रण करणाऱ्या रांगोळ्यांनी उपस्थितांची मने जिंकली.

रांगोळी प्रदर्शन,आरोग्य शिबिर आणि रक्तदान शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे, पुरातत्त्व विभागाचे उपायुक्त डॉ. विलास लहाने,कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फळ विभागाचे प्रमुख कोंडे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी पियुष विजयकुमार शहा, निलेश खाणेकर, प्रकाश ढमढेरे, शिरीष मोहिते,आप्पा घाटे,अशोक जाधव, मनीषा सागवेकर आदी मान्यवर उपस्थित होते. रांगोळी प्रदर्शनामध्ये छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म, राजमाता जिजाऊंसोबतचे संबंध, राज्याभिषेक सोहळा तसेच त्यांच्या शौर्य, पराक्रम आणि राष्ट्रनिष्ठेचे दर्शन घडविणाऱ्या विविध रांगोळ्यांचा समावेश करण्यात आला होता. या रांगोळ्यांमधून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे विविध पैलू प्रभावीपणे उलगडण्यात आले.

याचबरोबर महिला स्वच्छतादूत भगिनींसाठी स्तन कर्करोग तपासणी शिबिर,ज्येष्ठ नागरिकांसाठी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर तसेच ईसीजी, सीबीसी, मधुमेह, रक्तदाब आणि दंत तपासणीसह विविध आरोग्य तपासण्यांचे आयोजन करण्यात आले. रक्ताचा प्रत्येक थेंब अमूल्य असल्याचा संदेश देत भव्य रक्तदान शिबिरही पार पडले. तसेच गोशाळांना गोधनाच्या खाद्यस्वरूपात मदत करण्यात आली.

यावेळी नगरसेवक प्रशांत जगताप, नगरसेवक कुणाल टिळक, नगरसेविका स्वप्नाली नितीन पंडित, सामाजिक कार्यकर्ते उदय जगताप, ॲड. गणेश सातपुते, ॲड. अरुण लंबुगोळ, अक्षय शहापूरकर, उद्योजक संदीप शहा, दादासाहेब गुजर आदी मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली.

## माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना अभिवादन करून कृषिदिन साजरा



जेजुरी (दै. संध्या)

जेजुरी नगरपालिकेच्या वतीने बुधवारी (दि.१) महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त प्रतिमेला पुष्पहार अर्पण करीत अभिवादन करण्यात आले.यावेळी मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले, आरोग्य सभापती कृष्णा कुदळे, नगरसेवक योगेश जगताप, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष रमेश लेंडे, नगरपालिकेचे सर्व विभागातील अधिकारी -कर्मचारी उपस्थित होते. १जुलै १९१३ साली विदर्भातील गहुली (जि. यवतमाळ) या खेड्यातील एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्म झालेल्या वसंतराव नाईक यांचे प्राथमिक शिक्षण झाल्यानंतर त्यांनी नागपूर विद्यापीठातून बी. ए. व कायद्याची पदवी संपादन केली. पुसद येथून वकिली व्यवसायाला प्रारंभ केलेले नाईक सन.१९५१-५२ मध्ये काही काळ मध्य प्रदेशातील मंत्रिमंडळात महसूल मंत्री होते. महाराष्ट्राच्या पुनर्रचनेनंतर कांग्रेस पक्षात प्रवेश करून ते राज्याच्या राजकारणात सक्रिय झाले.१९५७-६० दरम्यान मुख्यमंत्री कन्नमवार मंत्रिमंडळात त्यांचेवर महसूल मंत्रिपदाची जबाबदारी सोपविण्यात आली.

## कॉर्निया प्रत्यारोपणाने महिलेला नवी दृष्टी

नारायणगाव (दै. संध्या)

'नेत्रदान हेच श्रेष्ठ दान' या सुप्रसिद्ध संदेशाला प्रत्यक्ष कृतीत उतरवणारी एक कौतुकास्पद घटना नारायणगाव येथे घडली आहे. नारायणगाव येथील गॅलेक्सी आय हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून एका ६३ वर्षीय महिलेवर यशस्वी कॉर्निया (नेत्रपटल) प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. नारायणगाव परिसरातील रहिवासी असलेल्या वंदना खंडू डुंबरे यांच्या डोळ्याच्या बुबुळावर लहानपणापासूनच एक पांढरा डाग होता. या दोषामुळे त्यांना दृष्टीदोष निर्माण झाला होता. त्यांनी अनेक ठिकाणी उपचार केले, परंतु त्यांना कुठेही अपेक्षित यश आले नाही. अखेर त्यांनी नारायणगाव येथील गॅलेक्सी आय हॉस्पिटलमध्ये तपासणी केली. तेथील तज्ज्ञ डॉक्टरांनी त्यांना कॉर्निया प्रत्यारोपण हाच एकमेव प्रभावी उपाय असल्याचे सांगितले. डॉक्टरांचे यशस्वी प्रयत्न योग्य नेत्रादात्याकडून कॉर्निया उपलब्ध झाल्यानंतर, ३० मे रोजी पुण्याच्या प्रसिद्ध कॉर्निया तज्ज्ञ डॉ. आरुषी गोयल देशमुख यांनी ही अत्यंत गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. या शस्त्रक्रियेनंतर वंदना डुंबरे यांच्या डाव्या डोळ्याची दृष्टी लक्षणीयरीत्या सुधारली आहे. अनेक वर्षांनंतर पुन्हा स्पष्ट दृष्टी मिळाल्यामुळे त्यांच्या आयुष्यात एक नवा प्रकाश आणि आशेचा किरण निर्माण झाला आहे. रुग्णाने आणि त्यांच्या कुटुंबाने डॉक्टरांचे तसेच नेत्रादात्याच्या कुटुंबाचे मनापासून आभार मानले आहेत. संस्थेचे विश्वस्त डॉ. संदीप डोळे यांनी सांगितले की, ग्रामीण भागात आजही डोळ्यात कचरा गेल्यास जिभेने काढणे, झाडाचा चीक किंवा शेळीचे दूध टाकणे यासारखे घरगुती व चुकीचे उपाय केले जातात. अशा अंधश्रद्धेमुळे अनेक रुग्ण आपली दृष्टी कायमची गमावून बसतात. त्यामुळे डोळ्यांची कोणतीही समस्या असल्यास वेळेवर नेत्रतज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

## जेजुरीतील कडेपठार कमान धोकादायक अवस्थेत

जेजुरी (दै. संध्या)

■ फलक लावला, जबाबदारी संपली ? जीर्ण कमानीकडे दुर्लक्ष

जेजुरीतील कडेपठार चौकातील संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा मार्गावर श्री खंडोबा देवता लिंग कडेपठार ट्रस्टच्या माध्यमातून उभारलेली स्वागत कमान सध्या अत्यंत जीर्ण अवस्थेत उभी आहे. याचा धोका खंडोबा भाविक व वारकरी बांधवांना होऊ शकतो. मात्र याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे.

जेजुरी सासवड राष्ट्रीय महामार्गा जवळ कडेपठार मंदिराकडे जाणाऱ्या कडेपठार ट्रस्टच्या वतीने सुमारे 20 ते 22 वर्षापूर्वी स्वागत कमान उभारण्यात आली. ही कमान जीर्ण झाली असून या कमानीवर कोणीही चढू नये असा इशारा देणारा फलक लावण्यात आला होता. फलक लावून दोन वर्षे होऊनही याकडे संबंधितांनी लक्ष दिले नाही. यावरून





कमान धोकादायक असल्याची माहिती संबंधित प्रशासनाला आणि यंत्रणांना किमान एक वर्षापासून होती, हे स्पष्ट होते.

धोकादायक असल्याचे माहिती असूनही ही कमान आजपर्यंत दुरुस्त किंवा हटविण्यात का आली नाही? अशी चर्चा आता नागरिकांमध्ये सुरू आहे. या ठिकाणी जेजुरी नगरपरिषदेचा प्रवेश कर वसुली नाका असून दररोज मोठ्या प्रमाणात चारचाकी वाहने येथे थांबतात. त्याचबरोबर भाविकांच्या गाड्या, ट्रॅव्हल्स, शालेय बस, स्कूल व्हॅन आणि इतर वाहतुकीची सतत वर्दळ असते. त्यामुळे या ठिकाणी कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.

याच मार्गावरून संत श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा पालखी तळाकडे मार्गक्रमण करतो. लाखो वारकरी व भाविक याच कमानी खालून पालखी तळाकडे जात असतात. त्यामुळे भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

धोक्याची जाणीव गेली दोन वर्षभरापासून होती, मग प्रशासन नेमकी कोणत्या घटनेची वाट पाहत आहे? असा संतप्त सवाल जेजुरीकर उपस्थित करत आहेत.

लाखो भाविक, वारकरी, विद्यार्थी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या जीर्ण कमानीबाबत तातडीने निर्णय घेऊन आवश्यक कार्यवाही शासनाने करावी, ही जेजुरीकरांची मागणी आहे.

# शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त "सामाजिक न्याय दिन" साजरा

## नशा मुक्त भारत अभियानात सहभागी व्हा : समाज कल्याण आयुक्त दिपा मुधोळ : मुंडे

पुणे (दै. संध्या)

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या समतेच्या विचारांची जोपासना करण्यासोबतच नशा मुक्त भारत अभियानाअंतर्गत राज्यामध्ये होणाऱ्या विविध कार्यक्रमामध्ये सहभागी व्हा, आपल्या परिवारासह मित्रांनाही या अभियानात जोडण्याचे काम करावे, अभियान यशस्वी करण्याकरिता सर्व घटकांने पुढाकार घ्यावा, असे आवाहन राज्याच्या समाज कल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे यांनी केले.

सहायक आयुक्त, समाज कल्याण आणि श्री. शाहू मंदिर महाविद्यालय, पर्वती, यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज "सामाजिक न्याय दिन" नुकताच साजरा करण्यात आला. यावेळी समता दिंडी तसेच नशा मुक्त भारत अभियान अंतर्गत प्रभातफेरीचे





आयोजन करण्यात आले. समता दिंडीची सुरूवात राजीव गांधी ॲकडमी ऑफ ई-लर्निंग स्कुल अँड सायन्स ज्युनिअर कॉलेज, अनुराग सोसायटी, शिवदर्शन पूरग्रस्त वसाहत, पर्वती पायथा, पुणे येथून करून अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे श्री शाहू मंदीर महाविद्यालय, पर्वती पायथा, पुणे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करुन समता दिंडीचा समारोप करण्यात आला. यावेळी श्रीमती मुंडे यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज गुणवंत पुरस्कार प्राप्त विद्यार्थी-विद्यार्थीनींचा सन्मान करण्यात आला. समता दिंडीमध्ये समाज कल्याण कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद, समाज कल्याण विभागातील गृहप्रमुख, शासकीय वसतिगृहातील सर्व विद्यार्थी- विद्यार्थीनी उपस्थित होते.

यावेळी सहायक आयुक्त विशाल लोंढे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी डॉ.राधाकिसन देवढे, श्रीमती. सहायक आयुक्त मिना आंबाडेकर, सामाजिक न्याय राज्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी प्रमोद फडणीस, श्री. शाहू मंदिर महाविद्यालयाचे प्राचार्य विलास पाटील, महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे अरुण रोडे, फेस्कॉम, इस्कोपचे अध्यक्ष दिलीप पवार, महर्षी कर्वे समाज कार्य महाविद्यालयाचे प्राचार्य महेश ठाकूर, संचालिका, श्री शिवाजी मराठा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे प्राचार्य अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे पदाधिकारी सर्व आजी माजी सैनिक महार रेजिमेंट आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री. लोंढे यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचक केले. तसेच नशामुक्ती मित्र नोंदणी मोहिमेकरिता असलेल्या https://nmba.dosje.gov.in/volunteer/registration या लिंकवर अधिकाधिक नागरिक व विद्यार्थीनी नोंदणी करण्याचे आवाहन केले. तसेच श्री. देवढे यांच्यासमेवत उपस्थितांनी सामुहिकरित्या नशा मुक्तीबाबतची शपथ घेतली.

श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पर्वती, अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पर्वती, यशवंतराव चव्हाण लॉ कॉलेज, पुणे विद्यार्थीगृहाचे कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स, पर्वती, सर परशुराम भाऊ महाविद्यालय, पुणे आप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मुक्तांगण इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, श्री शिवाजी मराठा सोसायटीचे कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, श्री शिवाजी मराठा सोसायटीचे कॉलेज ऑफ इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट अॅण्ड रिसर्च विद्यार्थी, कर्मचारीवृंद तसेच एन.सी.सी. तसेच एन.एस. एस.गटाचे स्वयंसेवक, समतादूत, सर्व तालुका समन्वयक, विद्यार्थी उपस्थित होते.

## मियावाकी पद्धतीने ३,००० वृक्षांची लागवड

नारायणगाव (दै. संध्या)



शिक्षणासोबत पर्यावरण संवर्धनाची प्रभावी सांगड घालत आदर्श जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वडगाव आनंद या शाळेने आणखी एक मानाचा टप्पा गाठला आहे. नाविन्यपूर्ण शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांसाठी राज्यभर ओळख निर्माण केलेल्या या शाळेच्या परिसरात एम्पथी फाउंडेशन, मुंबई या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून मियावाकी पद्धतीने तब्बल ३,००० वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.

सुमारे १५ लाख रुपये खर्चाच्या या प्रकल्पामुळे ही शाळा महाराष्ट्रातील अशा प्रकारचा उपक्रम राबविणारी पहिली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठरणार आहे.

या संपूर्ण उपक्रमाला जिल्हा परिषद, पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. गजानन पाटील यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभले. तसेच गट विकास अधिकारी श्री. प्रतीक चन्नावर आणि गट शिक्षणाधिकारी श्री. अशोक लांडे यांनी शैक्षणिक गुणवत्ता व नाविन्यपूर्ण उपक्रमांना नेहमीच प्रोत्साहन देत या प्रकल्पासाठी मोलाचे सहकार्य केले.

शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेले सामाजिक कार्यकर्ते श्री. डी. बी. (नाना) वाळुंज तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. दत्तात्रय चौगुले पाटील यांनी एम्पथी फाउंडेशन, मुंबई यांच्याकडे हा प्रकल्प राबविण्याची विनंती केली. त्यांच्या या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत संस्थेने कोणताही विलंब न लावता १५ लाख रुपयांचा हा पर्यावरणपूरक प्रकल्प मंजूर करून प्रत्यक्षात साकारला.

या प्रकल्पासाठी एम्पथी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुंदरेश्वरन तसेच प्रकल्प व्यवस्थापक श्री. दिनेश जोरे यांनी विशेष पुढाकार घेतला. वृक्षलागवडीचे तांत्रिक काम ठेकेदार श्री. राजकुमार दिवाकर यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केले.

शाळेच्या वतीने मुख्याध्यापक श्री. सुनील ठिकेकर, सहशिक्षिका सौ. छाया डुंबरे, सौ. सुनंदा तांबे, सौ. गीता बोराडे आणि सौ. सविता खेत्री यांनी प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी मोलाचे योगदान दिले.

या अभिनव पर्यावरणपूरक उपक्रमाचे सरपंच सौ. रेलिका जाधव, उपसरपंच श्री. गणेश भुजबळ, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य तसेच ग्रामविकास अधिकारी श्री. ज्ञानेश्वर मुकणे यांनी मनःपूर्वक स्वागत करून प्रकल्पाला शुभेच्छा दिल्या.